

कृष्णकृपाश्रीमूर्ती भक्तिसिद्धांत सरस्वती प्रभुपाद यांच्या मार्गदर्शनाखाली हरे कृष्ण संस्थेचे संस्थापकाचार्य कृष्णकृपाश्रीमूर्ती ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी ही पत्रिका BACK TO GODHEAD या नावाने १९४४ साली स्थापन केली.

'जाऊ देवाचिया गावा' हे अखिल मानवतेचे आध्यात्मिकीकरण करण्याचे सांस्कृतिक साधन आहे. आमचे उद्देश :

१. सर्वांना भ्रमापासून सत्य अर्थात, जडापासून चेतन, क्षणभंगुरतेपासून नित्यता वेगळे पाहण्यास मदत करणे.
२. भौतिकवादाचे दोष उघडे करणे.
३. वैदिक संस्कृतीनुसार आध्यात्मिक जीवनाकरिता प्रशिक्षण देणे.
४. वैदिक संस्कृतीचे जतन आणि प्रचार करणे.
५. भगवान श्रीचैतन्य महाप्रभूंच्या शिकवणीनुसार भगवंतांच्या दिव्य नामाचे संकीर्तन करणे.
६. पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांचे स्मरण करण्यात आणि त्यांची सेवा करण्यात अखिल जीवमात्रांना मदत करणे.

बी.बी.टी. विश्वस्त प.पू. गोपालकृष्ण गोस्वामी महाराज, प.पू. जयाद्वैत स्वामी महाराज • **संपादकीय मंडळ प्रमुख** प.पू. लोकनाथ स्वामी महाराज • **संपादक** श्यामानंद दास • **उप संपादक** मदन गोपाल दास • **सहाय्यक** रघुपती दास, रोहिणीकुमार दास, विठ्ठलदेव दास, वृंदावन किशोर दास • **व्यवस्थापन** सनतकुमार दास, गोविंद दास • **प्रकाशक** युधिष्ठीर दास • **मांडणी आणि कला** सुंदररूप दास • **उत्पादन** सच्चिदानंद दास • **कोषाध्यक्ष** सहदेव दास • **वितरण व्यवस्थापक** पांडुरंग दास • **वितरण कार्यालय** मंजरी देवी दासी • **सल्लागार मंडळ** वृंदावन आनंद दास, अक्रूर दास, राधेश्याम दास, देवामृत दास.

©२००९,भक्तिवेदान्त बुक ट्रस्ट इंटरनॅशनल, भक्तिवेदांत बुक ट्रस्टच्या वतीने उज्जवल जाजू द्वारा मुद्रित आणि प्रकाशित. **मुद्रण : मॅग्ना ग्राफिक्स** लि.,१०१ सी ॲन्ड डी, गव्हर्नमैन्ट इन्डस्ट्रीयल इस्टेट, कांदीवळी, मुंबई -६७. येथे तर प्रकाशन ह्न ३३, जानकी कुटीर, जुहू, मुंबई ह्न ४९ येथे करण्यात आले. संपादक : श्यामानंद दास, श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, चौपाटी, मुंबई ह्न ७

जाऊ देवाचिया गावा

हरे कृष्ण संस्थेची मराठी पत्रिका

वर्ष ८, अंक १३ - सप्टेंबर २००९

श्रील प्रभुपाद प्रवचन

२ अंत:करणात भगवंतांचे दर्शन

६ भगवद्धाम

१० केवळ फायदाच फायदा !!!

१३ एक कृष्णभावनाभावित दिवस

१४ भगवान परशुरामांची क्रांती

२१ मैथुनामध्ये कोणता दोष आहे?

२४ माझा पुत्रच पथप्रदर्शक गुरू ठरला

२६ सर्वश्रेष्ठ वरदान

वैष्णव दिनदर्शिका ४
ऑगस्ट - सप्टेंबर २००९

श्रील प्रभुपाद उवाच १८
आद्य निर्मात्याला श्रेय द्या

संपादकीय ३२
पैसे की भक्ती - श्रेष्ठ काय?

क्षमस्व

आमच्या आगस्ट २००९ अंकांच्या मुखपृष्ठावरील श्री गणेशांच्या चित्रासंबंधी सदस्यांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, त्याकरिता आम्ही सप्टेंबर २००९ च्या या अंकात श्री गणेशांचे एक सुंदर चित्र प्रस्तुत करीत आहोत. विशेषेकरून, कोल्हापूरमधील सदस्यांनी आपल्या प्रतिक्रिया त्वरित कळविल्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

- संपादक

जाऊ देवाचिया गावा ही पत्रिका वर्षातून बारा वेळा प्रकाशित केली जाते. सदस्यता शुल्क: वार्षिक रु. १५०.००, द्वैवार्षिक : रु. ३००.०० पंचवार्षिक : रु. ७००.००. आपण कोणत्याही महिन्यापासून सदस्य होऊ शकता. मनीऑर्डर Jau Devachiya Gava या नावाने करावी. ती पाठविताना किंवा संपादकाबरोबर पत्रव्यवहार करताना आपले संपूर्ण नाव आणि पत्ता पिनकोडसहित सुवाच्च अक्षरात लिहावा. पत्ता बदलला असल्यास त्वरित संपर्क साधावा. चेकने रक्कम पाठविणे असल्यास मुंबई बाहेरच्या चेकचे रु १०.०० अधिक द्यावे लागतील. चेक जाऊ देवाचिया गावा या नावाने लिहावा. वरील सर्व कारणांकरिता आमचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे: 'जाऊ देवाचिया गावा' ३०२, अमृत इंडस्ट्रियल एस्टेट, ३रा मजला, पश्चिम एक्सप्रेस हाइवे, मीरा रोड (पूर्व), ४०११०४, दूरध्वनी:-०२२ ३२५५६७०१. **संपर्कासाठी पत्ता :** नंददुलाल दास,जाऊ देवाचिया गावा,श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, ७, के.एम.मुन्शी मार्ग, गिरगाव चौपाटी, मुंबई -७. e-mail : JauDevachiyaGava@pamho.net

हरे कृष्ण संस्थेतील भक्तांची नावे ही, भगवंत किंवा भगवद्भक्तांच्या नावापुढे दास (पुरुषांना) आणि देवी दासी (स्त्रियांना) असे जोडून दिली जातात. उदाहरणार्थ: कृष्ण दास, राम दास, मध्वाचार्य दास, राधा देवी दासी, यमुना देवी दासी.

अंत:करणात भगवंतांचे दर्शन

जड इंद्रियांद्वारे नव्हे तर गुरू-साधू-शास्त्र यांच्या निर्देशानुसार कार्य केल्यास आपण भगवंतांच्या दिव्य रूपाचे अंत:करणात दर्शन करू शकतो.

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे संस्थापकाचार्य
कृष्णकृपाश्रीमूर्ती ए. सी. भक्तिवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद
यांनी भागवतावर (१.२.१२) दिलेले प्रवचन.

तच्छ्रद्दधानाना मुनयो ज्ञानवैराग्ययुक्तया।
पश्यन्त्यात्मनि चात्मानं भक्त्या श्रुतगृहीतया।।

''ज्ञान आणि वैराग्याने पूर्ण असा प्रामाणिक जिज्ञासू विद्यार्थी अथवा ऋषी, वेदांत-श्रुतीतून त्याने जे श्रवण केले त्यानुसार भक्तिमय सेवेचे आचरण करून परम सत्याचा साक्षात्कार करतो.'' (श्रीमद्भागवत १.२.१२)



परिपूर्ण सत्य असणाऱ्या भगवंतांप्रती भक्तिमय सेवेच्या प्रक्रियेद्वारे परम सत्याचा पूर्ण साक्षात्कार होतो. *ब्रह्म* म्हणजे त्यांची दिव्य अंगकांती आहे आणि *परमात्मा* म्हणजे त्यांचा विस्तारित अंश आहे. *ब्रह्म* किंवा *परमात्मा* स्वरूपाची अनुभूती म्हणजे परम सत्याचा केवळ आंशिक साक्षात्कार आहे. चार प्रकारची लोक असतात - कर्मी, ज्ञानी, योगी आणि भक्त. कर्मी हे भौतिकवादी असतात, तर इतर तिघे अध्यात्मवादी असतात. परम पुरुषाचा साक्षात्कार झालेले भक्त हे प्रथम श्रेणीची अध्यात्मवादी आहेत. ज्यांना परम पुरुषाच्या विस्तारित रूपाचा (परमात्मा स्वरूपाचा) साक्षात्कार झाला आहे ते द्वितीय श्रेणीचे अध्यात्वादी आहेत आणि ज्यांना परम पुरुषाच्या ब्रह्मज्योतीचा साक्षात्कार झाला आहे तृतीय श्रेणीचे अध्यात्मवादी आहेत.

भगवद्गीतेत आणि इतर वैदिक शास्त्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे, पूर्ण ज्ञान आणि भौतिक संगापासून वैराग्य यांची जोड असलेल्या भक्तिमय सेवेद्वारेच परम पुरुषाचा पूर्ण साक्षात्कार होतो. ज्ञान आणि वैराग्य हे भक्तिमय सेवेच्या पाठोपाठ येतात. ज्याप्रमाणे *ब्रह्म* आणि *परमात्मा* स्वरूपांचे

साक्षात्कार हे परम सत्याचे अपूर्ण साक्षात्कार आहेत, त्याचप्रमाणे *ब्रह्म* आणि *परमात्मा* स्वरूपांचे साक्षात्कार करून देणारे ज्ञान आणि योग-मार्गही परम सत्याचा साक्षात्कार करून देणारी अपूर्ण साधने आहेत. पूर्ण ज्ञान तसेच भौतिक संगतीपासून निरासक्ती यांच्या पार्श्वभूमीवर आधारित असलेली आणि वेदांत-श्रुतीच्या श्रवणाने दृढ झालेली भक्ती हाच परिपूर्ण असा एकमेव मार्ग आहे. या मार्गाचे पालन करणारा गंभीर आणि जिज्ञासू विद्यार्थी परम सत्याचा साक्षात्कार करू शकतो.

म्हणून भक्ती ही अल्पबुद्धी वर्गातील अध्यात्मवाद्यांसाठी नाही. एकूण तीन श्रेणींचे भक्त असतात – उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ. नवसाधक किंवा कनिष्ठ भक्त आध्यात्मिक ज्ञानात तितके प्रगत नसतात तसेच ते भौतिक संगापासून अनासक्तही नसतात. ते केवळ मंदिरातील विग्रह अर्चनेच्या प्राथमिक प्रक्रियेकडे आकृष्ट झालेले असतात. अशा भक्तांना *प्राकृत भक्त* म्हणतात. प्राकृत भक्त हे आध्यात्मिक लाभापेक्षा भौतिक लाभाकडे अधिक आसक्त असतात. त्यामुळे, मनुष्याने प्राकृत भक्तिमय सेवेपासून दुसऱ्या श्रेणीच्या भक्तिमय सेवेप्रत प्रगती निश्चितच केली पाहिजे. या मध्यम अवस्थेतील भक्त भगवंत आणि इतर भक्तांची मनोभावे सेवा करतो तसेच तो अज्ञानी व्यक्तीवर कृपा दाखवून द्वेषी लोकांपासून दूर राहतो. मनुष्याने निदान दुसऱ्या श्रेणीतील भक्तांच्या स्तरावर उन्नत व्हावे आणि त्यायोगे परम सत्याला जाणण्यास पात्र व्हावे. यासाठी तिसऱ्या श्रेणीतील भक्ताने भागवताच्या अधिकृत स्रोतांकडून भक्तिमय सेवेबाबत शिकवणूक घ्यावी.

प्रथम क्रमांकाचा भक्त म्हणजे भक्तीमध्ये पूर्णपणे प्रस्थापित झालेले व्यक्तिमत्त्व होय. अशा भक्ताला *भागवत* म्हटले जाते. भगवंतांच्या उपदेशांना देखील *भागवत म्हटले जाते.* म्हणून तिसऱ्या श्रेणीतील भक्ताने धंदेवाईक भागवत कथाकाराकडून नव्हे तर सूत



गोस्वामींप्रमाणे शुकदेव गोस्वांमीचा प्रतिनिधी असणाऱ्या महाभागवताकडूनच भगवद्कथेचे श्रवण करावे. परंतु, अनेकदा नवसाधकाला अधिकारी व्यक्तीकडून श्रवण करण्याची फार कमी उत्सुकता असते. असा भक्त आपल्या इंद्रियतृप्तीकरिता धंदेवाईक मनुष्याकडून श्रवण करण्याचा देखावा करतो. अशा धंदेवाईक कथाकारांमुळे फार मोठे नुकसान झाले आहे. म्हणून आध्यात्मिक मार्गात प्रगती करू इच्छिणाऱ्या नवसाधकाने अशा लोकांकडून भगवद्कथा श्रवण करणे टाळावे.

भगवद्गीतेत किंवा भागवतामध्ये सांगितलेले आध्यात्मिक संदेश नि:संशय दिव्य आहेत. पण, तरीसुद्धा अशा प्रकारचे दिव्य विषय धंदेवाईक कथाकाराकडून ग्रहण करावयाचे नसतात. सर्पाच्या स्पर्शामुळे दूध विषारी बनते, त्याप्रमाणे अभक्ताकडून भगवद्कथा श्रवण केल्याने नवसाधकाची चेतना दूषित बनते. तो वास्तविक भक्तिमार्गापासून मार्गभ्रष्ट होतो.

म्हणून प्रामाणिक भक्ताने आध्यात्मिक प्रगतीसाठी केवळ गुरुशिष्य परंपरेतून आलेल्या अधिकृत व्यक्तींकडूनच वेदशास्त्रांचे श्रवण करावे. नाहीतर, स्वत:च्या तर्कानुसार भक्ती करणे म्हणजे काळाचा व्यर्थ अपव्यय आहे. म्हणूनच, भक्तिमय सेवा ही श्रुती, स्मृती, पुराणे, पंचरात्र यांतील सिद्धांतावर आधारित नसेल तर अशा भक्तीचे हे व्यर्थ प्रदर्शन बहिष्कृत केले

पाहिजे. अनाधिकृत भक्ताला शुद्ध भक्त म्हणून कधीही मान्यता देऊ नये. वैदिक शास्त्रांमधील संदेश आत्मसात केल्यास मनुष्य भगवंतांच्या सर्वव्यापी परमात्मा स्वरूपाला सतत आपल्या अंत:करणात पाहू शकतो. यालाच *समाधी* म्हणतात.

येथे भागवत सांगते की, समाधी प्राप्त करण्यासाठी पहिली आवश्यकता म्हणजे श्रद्धा. चैतन्य-चरितामृतामध्ये श्रद्धेची व्याख्या अशी केली आहे –

'श्रद्धा' शब्दे-विश्वास कहे सुदृढ निश्चय।
कृष्णे भक्ति कैले सर्वकर्म कृत हय।।

श्रीकृष्णांचा भक्त झाल्याने आपल्याला पूर्णत्व प्राप्त होईल, असा दृढ विश्वास निर्माण होणे म्हणजे *श्रद्धा* होय.

असणाऱ्या श्रीपाद शंकराचार्यांनी आपल्या अनुयायांना सांगितले, ''प्रथम संन्यासी व्हा, मगच ब्रह्माविषयी चर्चा करा.'' खरोखरच ज्ञानी असलेल्या व्यक्तीने भौतिक वस्तूंची सर्व आसक्ती त्यागलेला वैरागीही असले पाहिजे. या विश्वासाची, शरणागतीची, ज्ञानाची आणि वैराग्याची परिणिती म्हणजे *पश्यन्त्यात्मनि चात्मानम्* – मनुष्य स्वत:च्या मनामध्ये आणि हृदयात परमात्म्याला पाहतो. श्रीमद्भागवतामध्ये (१२.१३.१) याला पुष्टी दिली आहे – *ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिन:* – ''एक परिपूर्ण योगी नेहमी स्वत:च्या हृदयात भगवंतांना पाहतो.''

परिपूर्ण योग्याला भगवंतांविषयी शुद्ध प्रेम असते. ब्रह्मसंहितेत (५.३८)

''भगवत्प्रेमरूपी अंजनाने ज्याचे नेत्र शोभित आहे, असा भक्त भगवान श्रीकृष्णांच्या श्यामसुंदर रूपाचे सतत आपल्या हृदयात दर्शन करतो.''

भगवद्गीतेत (१८.६६) श्रीकृष्ण सांगतात,

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:।।

''सर्व प्रकारच्या धर्मांचा त्याग कर आणि केवळ मलाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. तू भयभीत होऊ नकोस.''

या आज्ञेचा स्वीकार करून मनुष्य कोणताही विचार न करता श्रीकृष्णांना शरण जातो, तेव्हा त्याला *श्रद्धा* असे म्हणतात. अशा विश्वासाने श्रीकृष्णांना शरण जाणाऱ्या व्यक्तीला *मुनि* किंवा ज्ञान आणि वैराग्याने पूर्ण असा *महात्मा* म्हटले जाते. *(तच्छ्रद्दधाना मुनयो ज्ञानवैराग्ययुक्तया).* ज्ञान आणि वैराग्याची प्राप्ती करणे हे मनुष्य जीवनाचे ध्येय आहे. केवळ ज्ञान व्यर्थ आहे, त्याबरोबर वैराग्यही असले पाहिजे. म्हणूनच मायावादी शाखेचे संस्थापक सांगितल्याप्रमाणे *प्रेमाञ्जनच्छुरित भक्तिविलोचनेन सन्त: सदैव हृदयेषु विलोकयन्ति* – ''भगवत्प्रेमरूपी अंजनाने ज्याचे नेत्र शोभित आहे, असा भक्त भगवान श्रीकृष्णांच्या श्यामसुंदर रूपाचे सतत आपल्या हृदयात दर्शन करतो.'' श्रीकृष्ण किती सुंदर आहेत याची आपण कल्पनाही करू शकत नाही. असे म्हटले आहे की त्यांचे शरीर हे कोट्यवधी कामदेवांपेक्षाही अधिक सुंदर आहे. *(कन्दर्पकोटिकमनीयविशेषशोभं).* कामदेव अतिशय सुंदर आहे; परंतु कोट्यवधी कामदेव एकत्र केले तरी त्यांचे सौंदर्य हे श्रीकृष्णांच्या सौंदर्याशी तुलना करू शकत नाही. अंत:करणात भगवत्प्रेमाचा प्रादुर्भाव झाल्याखेरीज या गोष्टी कळणे शक्य नाही.

आपण आपल्या वर्तमान मर्यादित इंद्रियांनी परमेश्वराला जाणू शकत नाही. ही इंद्रिये केवळ भौतिक इंद्रियतृप्तीच्या मागे धावत असतात. पूर्णपणे दिव्य असणाऱ्या श्रीकृष्णांना आपण जड इंद्रियांद्वारे कसे जाणू शकणार? म्हणून साधकाने गंभीरपणे भक्तिमय सेवेचा अवलंब करून आपल्या इंद्रियांना शुद्ध बनविले पाहिजे.

अत: श्रीकृष्णनामादि न भवेद् ग्राह्यमिन्द्रियै:।
सेवोन्मुखे हि जिह्वादौ स्वयमेव स्फुरत्यद:।।

''भौतिकतेने दूषित झालेल्या आपल्या इंद्रियांद्वारे कोणीही श्रीकृष्णांचे नाम, रूप, गुण आणि लीलांचे स्वरूप जाणू शकत नाही. जेव्हा मनुष्य आपल्या जिह्वादी इंद्रियांना भगवंतांच्या सेवेत रत करतो तेव्हा त्याला आपोआपच भगवंतांच्या दिव्य नाम, रूप, गुण, लीलांचा साक्षात्कार होतो.''(भक्तिरसामृतसिन्धु – १.२.२३४)

भगवंतांच्या सेवेत संलग्न होण्याची क्रिया ज्ञान आणि वैराग्याच्या स्तराप्रत येण्यासाठी पूरक आहे. *अहं ब्रह्मास्मि* – ''मी म्हणजे हा भौतिक देह नाही; मी आत्मा आहे.'' हे जाणणाराच ज्ञानी आहे. वर्तमान स्थितीत आपण स्वत:ला शारीरिक नातेसंबंधांवर आधारित अशी उपाधी दिलेली आहे. आपण विचार करतो – ''मी अमेरिकन आहे'', ''मी भारतीय आहे'', ''मी ब्राह्मण आहे'', ''मी काळा आहे'', ''मी गोरा आहे'', ''मी बलवान आहे'', ''मी अशक्त आहे'', ''मी मोठा आहे'', ''मी कृश आहे''. पण, या सर्व शारीरिक उपाधी आहेत. जेव्हा मनुष्य या उपाधींपासून मुक्त होऊन विचार करतो, ''मी श्रीकृष्णांचा नित्य दास आहे,'' तेव्हा त्याला खरे ज्ञान प्राप्त होते.

पूर्वीच सांगितल्याप्रमाणे, श्रीकृष्णांच्या भक्तिमय सेवेत संलग्न झाल्यास आपोआपच ज्ञान आणि वैराग्य येते. अशी ही भक्तिमय सेवा अधिकृत वेदशास्त्रांतील आदेशांनुसारच आचरणात आली पाहिजे. भक्तिरसामृतसिंधूमध्ये (१.२.१०१) श्रील रूप गोस्वामी याला पुष्टी देतात.

श्रुतिस्मृतिपुराणादिपञ्चरात्रविधिं विना।
ऐकान्तिकी हरेर्भक्तिरुत्पातायैव कल्पते।।

''उपनिषदे, पुराणे यांसारख्या अधिकृत वैदिक शास्त्रांकडे आणि नारद पंचरात्राकडे दुर्लक्ष करून केलेली भगवद्भक्ती म्हणजे समाजामध्ये केवळ उत्पात माजविण्यास कारणीभूत ठरते.''

या ग्रंथांचा स्वीकार गुरुशिष्य परंपरेद्वारेच केला पाहिजे. दुसऱ्या शब्दांत, भक्तीचे विज्ञान शिकण्यासाठी श्रीकृष्णांपासून येणाऱ्या गुरुशिष्य परंपरेपतील गुरूचाच स्वीकार केला पाहिजे. भगवद्गीता समजण्यासाठी मनुष्याने ती, अर्जुनाने जशी श्रीकृष्णांकडून समजून घेतली, तशी श्रीकृष्णांकडून किंवा त्यांच्या प्रतिनिधीकडून नम्र आणि सेवाभावाने स्वीकारावी. अर्जुनही गुरुशिष्य परंपरेचा एक सदस्य आहे. गुरुशिष्य परंपरा खंडित झाल्यामुळे आणि भगवद्गीतेचे ज्ञान लुप्त झाल्यामुळे श्रीकृष्णांनी पुन्हा ती अर्जुनाला सांगितली. अर्जुनाने ज्याप्रमाणे श्रीकृष्णांना आणि भगवद्गीतेला जाणून घेतले त्याप्रमाणे आपणही त्यांना जाणून घेतले तर आपले ज्ञान परिपूर्ण होईल. परंतु, आपण जर भगवद्गीतेचा काल्पनिक अर्थ लावला तर तो केवळ कालापव्यय होईल.

आपण आपला बहुमूल्य वेळ वाया घालवू नये. श्रीकृष्णांनी स्वत:चे भगवद्गीतेत जसे वर्णन केले आहे तशा यथार्थ रूपात त्यांना आपण जाणून घ्यावे. जेव्हा भगवंत सांगतात, ''मी असा आहे,'' तर त्यांना वेगळ्या पद्धतीने समजून घेण्यात वेळ का वाया घालवावा? श्रीकृष्ण स्पष्टपणे सांगतात, ''मीच भगवान आहे. हे माझा नाव आहे, हा माझा पत्ता आहे, या माझ्या लीला आहेत.'' सर्व काही दिलेले आहे. आपण भगवंतांकडून त्यांच्याबद्दल जाणून का घेत नाही? त्यांना समजून घेण्याचे स्वत:चेच मार्ग का निर्माण करीत आहोत?

कृष्णभावनामृत आंदोलन गुरू-साधू-शास्त्र यांच्या निर्देशनानुसारच भगवद्ज्ञान वितरित करीत आहे. भगवद्गीतेत श्रीकृष्ण म्हणतात, *मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु* – ''माझे चिंतन कर, माझा भक्त होत, माझे पूजन कर आणि मलाच नमस्कार कर.'' आणि आम्हीदेखील तेच शिकवित आहोत. ही प्रक्रिया आचरणात आणणे काही कठीण नाही. कोणीही तिचे अनुसरण करू शकतो. कधी कधी लोक म्हणतात की, कृष्णभावनामृत आंदोलनाचा जगभर प्रचार करून मी फार मोठे आश्चर्यकारक कार्य केले आहे; परंतु, मी केवळ श्रीकृष्णांना, ते जसे आहेत तसेच प्रस्तुत केले आहे. हेच यामागचे गुपित आहे. म्हणून, कोणीही भगवद्गीता आणि श्रीमद्भागवतातून श्रीकृष्णांना, ते जसे आहेत तसेच जाणून आपले जीवन परिपूर्ण बनवू शकतो. अन्यथा, भगवंतांना जाणण्यासाठी आपण दुसरी कोणतीही पद्धत शोधून काढली, तर तो केवळ निरर्थक कालापव्ययच ठरेल.

वैष्णव दिनदर्शिका

ऑगस्ट-सप्टेंबर २००९

ऑगस्ट २००९

शनिवार १, श्री श्री राधा-गोविंद झूलन यात्रा आरंभ.

रविवार २, पवित्रोपिनी एकादशी; श्रील रूप गोस्वामी तिरोभाव; श्रील गौरीदास पंडित तिरोभाव.

सोमवार ३, पारणाची वेळ : ५.४३ – १०.१२

बुधवार ५, झूलन यात्रा समाप्त; भगवान बलराम आविर्भाव (दुपारपर्यंत उपवास).

शुक्रवार ७, चातुर्मास्याचा दुसरा महिना आरंभ (एक महिन्यासाठी दही वर्ज्य); श्रील प्रभुपादांचे अमेरिकेस प्रस्थान.

शुक्रवार १४, श्रीकृष्ण जन्माष्टमी (मध्यरात्री १२.०० पर्यंत उपवास).

शनिवार १५, श्री नंदोत्सव, श्री श्रीमद् ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद आविर्भाव (दुपारपर्यंत उपवास).

सोमवार १७, अन्नदा एकादशी. मंगळवार १८, पारणाचा वेळ : ५.५२ – १०.१४

सोमवार २४, श्रीमती सीता ठाकुरानी (अद्वैताचार्यांची पत्नी) आविर्भाव.

मंगळवार २५, श्रीमती ललिता देवी आविर्भाव (ललिता षष्टी).

गुरुवार २७, राधाष्टमी (दुपारपर्यंत उपवास).

सोमवार ३१, पार्श्व एकादशी.

सप्टेंबर २००९

शुक्रवार १, पारणाची वेळ : ५.५९ – १०.१४; भगवान वामनदेव आविर्भाव (एकादशीला दुपारपर्यंत उपवास); श्रील जीव गोस्वामी आविर्भाव.

शनिवार २, श्रील भक्तिविनोद ठाकूर आविर्भाव (दुपारपर्यंत उपवास).

गुरुवार ३, अनंत चतुर्दशी; श्रील हरिदास ठाकूर तिरोभाव.

शुक्रवार ४, श्री विश्वरूप महोत्सव; श्रील प्रभुपादांद्वारा संन्यास ग्रहण.

शनिवार ५, चातुर्मास्याचा तिसरा महिना आरंभ (एक महिन्यासाठी दूध वर्ज्य).

भगवद्धाम

परिपूर्ण स्वातंत्र्याचे ठिकाण

एका दहा वर्षाच्या मुलाने शंका व्यक्त केली -
''श्रीकृष्णांकडे गेल्यावर ते आपणास ओळखतील का?''

''अरेरे, मनुष्याच्या अंत:करणातील इच्छारूपी दोर किती विचित्र आहेत. या दोरांनी जो मनुष्य पूर्णपणे बांधला गेला आहे, तो सुखाच्या शोधात नेहमी इकडे तिकडे धावताना दिसतो. मात्र, या दोरांच्या बंधनातून मुक्त असलेला मनुष्य अंत:करणात समाधानी असल्याने ऐहिक सुखांमागे धावत नाही.'' - नितीशास्त्र

आमच्या भक्तसमुहातील बालकांसाठी आयोजित केलेल्या एका सत्संग कार्यक्रमात एका बालकाने प्रश्न विचारला - ''श्रीकृष्णांच्या धामात पतरण्याचा अनुभव कसा असेल?''

भौतिक जगातील क्लेशदायक प्रवास संपवून ज्या वास्तविक निवासस्थानी आपण परतू इच्छितो त्या गोलोक वृंदावन या भगवद्धामाविषयी मी थोडक्यात माहिती सांगू लागलो.

''गोलोक वृंदावन हे आध्यात्मिक जगत सर्व प्रकारच्या परिक्षा आणि गृहपाठापासून मुक्त आहे. तेथे दिवस-रात्री मौजमजेशिवाय दुसरे काहीच नसते. तेथील खेळांमध्ये कधीच व्यत्यय येत नाही.''

''वाह! किती छान!'' उपस्थित बालकांपैकी किरण म्हणाला.

''परंतु,'' त्याने शंका व्यक्त केली, ''इतके दिवस श्रीकृष्णांपासून दूर राहिल्याने भगवद्धामात परतल्यास श्रीकृष्ण आपल्याला ओळखतील का?''

''हो नक्कीच,'' मी उत्तरलो, ''एक प्रेमळ पिता या नात्याने अत्यंत अतुरतेने ते आपल्या पाल्याच्या घरी परतण्याची वाट पहात असतात.''

''परंतु, आपल्यासारखे अनेकजण याठिकाणी भौतिक जगात आहेत. आपण भगवद्धामात परतलो नाही, तर त्यामुळे श्रीकृष्णांना काही फरक पडतो का?''

''हो नक्कीच, कारण प्रत्येक जीवात्मा श्रीकृष्णांना अतिशय प्रिय आहे. आपल्याला त्यांच्या परमधामात परतल्याचे पाहून ते आपल्याकडे धावत येतील आणि प्रेमाने आलिंगन देऊन आनंदाश्रू ढाळतील.''

अशा प्रकारे पुढील तासभर आमची ही चर्चा चालली.

त्याच दिवशी संपूर्ण भारताने श्री. करमजित सिंग यांचे त्यांच्या कुटुंबियांशी झालेले ऐतिहासिक पुनर्मिलन साजरे केले. श्री. सिंग यांना भेटण्यासाठी आलेल्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावरील आनंदी भाव वार्ताहारांच्या कॅमेऱ्यांद्वारे टिपले जात होते. अगदी शेजारपाजारी देखील या आनंदोत्सवात सहभागी झाले. सर्व नातेवाईक, आप्तेष्ट श्री. सिंग यांच्या घरी परतल्याने आनंदाश्रू ढाळत होते.

एके दिवशी १९७३ सालच्या हिवाळ्यात युवावस्थेतील एक भारतीय, श्री. करमजित सिंह यांनी थोडे अधिक पैसे कमविण्याच्या आशेने भारताची सीमा ओलांडून पाकिस्तानात प्रवेश केला. त्यावेळी पाकिस्तानच्या सीमा रक्षक जवानांनी सीमेत घुसखोरी करताना करमजित सिंह यांना पकडून बंदिस्त केले. यानंतर पुढील ३५ वर्षे त्यांनी पाकिस्तानी कारागृहांमध्ये अतोनात

हालअपेष्टा सहन केल्या. पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या तावडीतून लवकर सुटका करून घेण्यासाठी त्यांनी अगदी इस्लाम धर्माचा देखील स्वीकार केला. शेवटी भारतीय सरकारच्या हस्तक्षेपामुळे त्यांची तब्बल साडेतीन दशकांनंतर कारावासातून सुटका झाली.

श्री. करमजित सिंह यांच्या सुटकेच्या आनंदात सहभागी होत असताना त्यांच्या जीवनाशी समांतर असा दृष्टिक्षेप आपण आपल्या भौतिक जगातील अस्तित्वावरही टाकू शकतो. प्रत्येक जीवात्मा आध्यात्मिक जगातील भगवंतांच्या कुटुंबाचा एक सदस्य आहे. तेथे आपल्या मूळ आध्यात्मिक स्थितीत भगवंतांच्या प्रसन्नतेखातर त्यांची प्रेममय सेवा करताना परिपूर्ण स्वातंत्र्य आणि अमर्याद दिव्यानंदाचा अनुभव करतो. मात्र, अल्पस्वातंत्र्याचा दुरुपयोग करीत स्वत: भोक्ता बनण्याच्या इच्छेने जेव्हा आपण या भौतिक जगात प्रवेश करतो तेव्हा भगवंतांची मायाशक्ती त्वरित आपल्यावर झडप घालून तिच्या तावडीत बंदिस्त करते.

पंजाब राज्यातील रहिवाशी असलेल्या करमजितांना आपल्या कुटुंबियांपासून प्रचंड विरह जाणवत होता .पाकिस्तानात त्यांना लाहोर, कराची, इस्लामाबाद अशा निरनिराळ्या ठिकाणी कारावासात ठेवण्यात आले. त्याठिकाणी प्रचंड शारीरिक, मानसिक क्लेश त्यांच्यावर लादण्यत आले. त्यांची ते निर्दोष असल्याची यचना कोणीच मनावर घेतली नाही.

मूळचे आध्यात्मिक जगतील रहिवाशी असल्याने आपणदेखील आपल्या मूळ निवासस्थानापासून दूर निघून आलो आहोत. चेतन जीवात्मा या नात्याने आपण स्वभावत:च भगवान श्रीकृष्णांचे सेवक आहोत. आध्यात्मिक जगतात भगवान श्रीकृष्णांची सेवा करताना आपण दिव्यानंद आणि परिपूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव करतो. पण, जेव्हा आपण भगवंतांपासून विन्मुख होऊन स्वतंत्रपणे या भौतिक जगात भोग घेण्याची इच्छा करतो, तेव्हा आपण भौतिक शरीरांमध्ये बंदिस्त होतो. त्यानंतर आपण कोटचवधी प्रकारच्या वनस्पती, पशू, जलचर शरीरांमधून संपूर्ण विश्वात भ्रमण करतो. मनुष्य शरीर प्राप्त झाल्यावर मात्र आपणास या जन्म-मृत्यूच्या दुस्तर चक्रातून मुक्त होण्याची संधी प्रदान केली जाते.

दुर्भाग्यवश, दुर्लभ मनुष्य जन्म प्राप्त होऊन देखील अनेकजण त्यांना प्राप्त झालेल्या प्रगत चेतनेचा वापर शरीरोपभोग वाढविण्यासाठी करतात आणि त्यामुळे ते मायाशक्तीच्या विळाख्यात अधिकाधिक अडकत जातात. शरीरोपभोगाद्वारे सुख प्राप्त करण्याचा निष्फळ प्रयत्न केल्यानंतर या शरीरात बंदिस्त असलेला जीवात्मा केवळ नैराश्य आणि व्यर्थतेचा अनुभव करतो.

चेतन जीवात्मा या नात्याने आपण स्वभावत:च भगवान श्रीकृष्णांचे सेवक आहोत. आध्यात्मिक जगतात भगवान श्रीकृष्णांची सेवा करताना आपण दिव्यानंद आणि परिपूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव करतो.

भगवद्गीतेत (१५.७) भगवान श्रीकृष्ण सांगतात,

ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन: ।
मन:षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ।।

''बद्ध जगातील जीव हे माझे सनातन अंश आहेत. बद्ध जीवनामुळे ते मनासहित सहा इंद्रियांशी कठीण संघर्ष करीत आहेत.''

या श्लोकावरील तात्पर्यात श्रील प्रभुपाद बद्ध जीवात्म्यांच्या भौतिक अस्तित्वातील संघर्षाचे कारण सांगतात - *प्रत्येक जीवात्म्याला स्वत:चे वैयक्तिक स्वरूप आणि आंशिक स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केल्याने जीव बद्ध होतो आणि स्वातंत्र्याचा योग्य उपयोग केल्याने तो सदैव मुक्त राहतो. या दोहोंपैकी कोणत्याही स्थितीत तो भगवंतांप्रमाणेच गुणात्मकदृष्ट्या सनातन आहे. मुक्तावस्थेमध्ये तो या भौतिक बद्ध जीवनातून मुक्त असतो आणि भगवंतांच्या दिव्य सेवेमध्ये संलग्न झालेला असतो. बद्ध जीवनामध्ये त्याच्यावर त्रिगुणांचे वर्चस्व असते आणि त्यामुळे त्याला दिव्य प्रेममयी भगवत्सेवेचे विस्मरण झालेले असते. परिणामी, या भौतिक जगतामध्ये आपले अस्तित्व राखण्यासाठी त्याला अत्यंत कठोर संघर्ष करावा लागतो.*

कारागृहातील तडजोडी

कारागृहातील अधिकाऱ्यांनी श्री. सिंग यांना अनेकप्रकारचे क्लेश दिले. त्यांना दगड फोडायला, शोचालय साफ करायला लावले जायचे आणि त्याबरोबर वाईट शब्दांद्वारे निर्भत्सना करून त्यांना अतोनात मानसिक त्रास देखील दिला जायचा. आपणास देखील या भौतिक जगरूपी कारागृहात जन्म, मृत्यू, जरा व्याधीच्या रूपात तसेच नैसर्गिक आपत्ती, इतर जीवांकडून तसेच स्वत:च्या शरीर आणि मनापासून देखील अनेक क्लेश भोगावे लागतात. या जगातील क्लेषांपासून मुक्त होण्यासाठी आपण अनेक प्रकारच्या तडजोडी करतो, योजना आखतो; परंतु, तरीही भौतिक प्रकृतीच्या जाचातून आपली सुटका काही होत नाही. करमजित सिंह यांनी कारागृहातील अधिकाऱ्यांना प्रसन्न करण्यासाठी केलेला इस्लाम धर्माचा स्वीकार, हा असाच एक प्रयत्न होता. यामुळे त्यांना जीवदान मिळाले, परंतु त्यांची सुटका मात्र झाली नाही. त्याचप्रमाणे बद्ध जीवात्मे भौतिक जगात सुखी होण्यासाठी

अनेक उपाध्या आणि साधनसामग्री संग्रहीत करतो. आपण स्वत:ला भारतीय, अमेरिकन, श्रीमंत, सुंदर असल्याचे मानतो. बाह्यत: इस्लाम धर्माचा स्वीकार करून देखील करमजित सिंह मूळीच सुखी नव्हते. तद्वत, शारीरिक स्तरावर अनेक तडजोडी करून देखील आपण या जगात नेहमी अपूर्णतेचा अनुभव करतो.

पाण्यातून बाहेर काढलेल्या माशाला कितीही सुखसुविधा पुरविल्या तरी तो कधीच संतुष्ट होऊ शकणार नाही. तो नेहमी पाण्यात परतण्यासाठी तडफडत असतो. त्याचप्रमाणे सुंदर व्यक्तीचा सहवास, आकर्षक सिनेमा, चांगली नोकरी अशी अनेक प्रलोभने मनुष्य शरीरात बंदिस्त झालेल्या जीवात्म्याला आकर्षित करतात खरे; परंतु, या सर्व गोष्टी प्राप्त होऊन देखील त्याचे अंत:करण नेहमी असंतुष्टच राहते. आध्यात्मिक जगत हे जीवात्म्यासाठी 'पाणी' असल्याने तेथे भगवान श्रीकृष्णांच्या चरणी अनन्य भावात सेवा अर्पण केल्यानेच तो वास्तविकपणे सुखी होऊ शकतो. भगवान श्रीकृष्ण आणि त्यांच्या शुद्ध भक्तांच्या चरणी प्रेममयी सेवा अर्पण करणे, हीच जीवात्म्याची स्वाभाविक स्थिती आहे. आणि या स्थितीतच तो परिपूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव करू शकतो.

या संदर्भात श्रील प्रभुपाद लिहितात –

जेव्हा जीव या प्राकृत देहाचा त्याग करून वैकुंठलोकात प्रवेश करतो तेव्हा त्याला त्याचे आध्यात्मिक शरीर प्राप्त होते. आपल्या आध्यात्मिक शरीराद्वारे तो भगवंतांना समोरासमोर पाहू शकतो. तो भगवंतांशी प्रत्यक्षपणे बोलू शकतो, ऐकू शकतो आणि त्यांना तत्त्वत: जाणू शकतो. (भगवद्गीता, श्लोक क्र. १५.७ – तात्पर्य)

कारागृहातील स्वातंत्र्य

करमजित सिंह यांना कारागृहामधून बाहेर पडण्याच्या खोट्या आशा दाखविण्यात आल्या, जेणेकरून ते त्यांच्यावरील आरोप कबुल करतील. परंतु, कारागृहातून सुटकेची आशा करीत ते दिवसामागून दिवस आपल्या प्रिय कुटुंबियांची आठव काढीत विलाप करीत राहिले. शेवटी घरी परतल्यानंतरच ते खऱ्या सुखद क्षणांचा अनुभव करू शकले.

परंतु, एका भक्तासाठी तो कृष्णभावनाभावित असल्याने मुक्ती आणि सुखाचा अनुभव करण्यासाठी त्याला भौतिक जगरूपी कारागृहातून मुक्त होण्याची वाट पहावी लागत नाही. अगदी या भौतिक जगात देखील सतत श्रीकृष्णांचे स्मरण, सेवा केल्याने तो आध्यात्मिक जगताचा अनुभव करू शकतो. अशा या भक्तिमार्गातून मिळणारा दिव्यानंद त्याला शारीरिक सुखदु:खांच्या पलिकडे घेऊन जातो.

घडलेल्या प्रसंगाकडे मागे वळून पाहताना करमजित म्हणाले – ''एक भयानक स्वप्न पडले होते, असे म्हणून मला हा संपूर्ण प्रसंग विसरून जायचा आहे.''

आपणदेखील श्रीकृष्ण आणि त्यांच्या भक्तांच्या संगतीत येताच भौतिक जगातील अस्तित्वाचे भयानक स्वप्न संपुष्टात येईल. भक्त श्रीकृष्णांना सोडून जाण्याच्या निर्णयाबद्दल पश्चात्ताप करतो. परंतु, भगवंतांशी पुन:संबंध प्रस्थापित झाल्याबद्दल तो आनंदी असतो आणि अत्यंत कृतज्ञतापूर्ण भावनेत कृष्णभक्तीचा स्वीकार करून भगवद्भक्तांचा संग करतो. हरिनामाचा जप, कीर्तन, कृष्णकथेचे श्रवण, कृष्णप्रसादाचे आस्वादन या सर्वांमुळे असा भक्त या भौतिक जगात देखील गोलोक वृंदावनाचा अनुभव करू शकतो.

श्रीकृष्ण वाट पाहात आहेत

पुढील रविवारी मी पुन्हा आमच्या भक्त समुहातील बालभक्तांना भेटलो तेव्हा मी त्यांना श्री. करमजित सिंह यांच्या सुटकेची कथा सांगितली. त्यातील किरणने त्वरित त्याचा आपल्या सर्वांच्या जीवनाशी असलेले साम्य ओळखले.

''परंतु, आपण ३५ वर्षे नव्हे, तर अनादी काळापासून श्रीकृष्णांकडे पाठ फिरविली आहे. आता आपण त्यांच्याकडे लवकर परतले पाहिजे. श्रीकृष्ण आपली वाट पाहात असतील, हो ना?''

हो नक्कीच, श्रीकृष्ण आपणा सर्वांची आतुरतेने वाट पाहात आहेत.

(व्रजविहारी दास (एम. बी. ए) हे मुंबईतील इस्कॉन मंदिरात ब्रह्मचारी आहेत आणि ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृष्णभावनेचा प्रचार करतात.)

भगवान श्रीकृष्ण आणि त्यांच्या शुद्ध भक्तांच्या चरणी प्रेममयी सेवा अर्पण करणे, हीच जीवात्म्याची स्वाभाविक स्थिती आहे. आणि या स्थितीतच तो परिपूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव करू शकतो.

हरे कृष्ण
हरे कृष्ण
कृष्ण कृष्ण
हरे हरे।
हरे राम हरे राम
राम राम हरे हरे।।

केवळ फायदाच फायदा !!!

भक्ती करण्यामध्ये कोणताच तोटा नसून केवळ फायदाच फायदा आहे.

– व्रजभक्ती दास

जीवनामधील प्रत्येक व्यवहारात सूज्ञ मनुष्य अनेकानेक निर्णय घेत असतो. बाजारातून एखादी वस्तू आणण्यापासून ते पैसे कोठे गूंतवायचे इथेपर्यंत. मुलांच्या शिक्षणापासून ते निवृत्तीनंतरच्या उपाययोजनेपर्यंत मनुष्य प्रत्येक बाबतीत अत्यंत चोखंदळ असतो. अशी सूज्ञवृत्ती जर आपण भक्तिमार्गाचा अवलंब करताना लावल्यास आपल्याला निश्चितच शाश्वत, आनंदी जीवन प्राप्त होऊ शकते. हे कसे शक्य आहे, याबाबत आपण थोडा विचार करुया.

भक्तिमार्गाचा स्वीकार करण्यापूर्वी काहीजणांच्या मनात बऱ्याचदा अनेक शंका घर करू लागतात. भक्तिमार्गाचा स्विकार केल्यास मी सध्याच्या आनंदाला, स्वतंत्र जीवनाला मुकणार तर नाही ना? या मार्गाचे पालन करण्यासाठी मला अनेक कडक नियमांचे पालन करावे लागेल, त्यावेळी माझे बाकीचे मित्र परिवार मात्र मौजमजा करत असतील. असे असताना मी त्यांचा विरोध का बरें ओढवून घेऊ? समजा, मी सर्व विरोध सहन करूनही या मार्गाचा अवलंब केला आणि काही कारणास्तव मी पूर्णत्वाला पोहोचू शकलो नाही तर माझी स्थिती त्रिशंकूसारखी तर होणार नाही ना?

या जगामध्ये प्रत्येक जण आनंदी होण्यासाठी प्रयत्नशील आहे. बऱ्याचदा तात्पुरत्या सुखासाठी मनुष्य अनेक अनैतिक आणि विकृत मार्गांचाही अवलंब करतो. अमेरिकेतल्या एका सिगारेटची जाहिरात अशी

होती – ''तंबाखुमूळे ४ लाख मेले तरी काय झाले! बाकीचे ४० लाख याची मजा लुटत आहेत हे तर पहा.'' वा! लोक आजकल विकृतीकडे सकारात्मक दृष्टीकोण ठेवत आहेत. बऱ्याचदा सध्याचे दु:ख विसरण्यासाठी माणूस अनेक उपाययोजना करत असतो. तो नशेच्या आहारी जातो. लोभापायी तो जुगार, झटपट श्रीमंत होण्याचे आश्वासन देणारे मार्ग अवलंबतो.

कोणी म्हणेल आम्ही तर अनैतिक आणि विकृत मार्ग अवलंबत नाही. आम्ही तर सरळमार्गी, निरुपद्रवी लोक आहोत. निश्चितच ही कौतुकास्पद गोष्ट आहे. परंतु दुर्मिळ मनुष्य जीवनाचे अंतिम ध्येय समजून घेतले नाही तर आपण एका सुवर्णसंधीस मुकत आहोत. अज्ञानामधील सुखामध्ये मनुष्य आनंदी राहण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला या जगातील धन, सुखसंपदा, नातीगोती इत्यादी सर्व मृत्युनंतर येथेच सोडावी लागतात. तरीसुद्धा तो अमर असल्याप्रमाणे सुखाच्या योजना बनवित असतो. भक्तिमार्गाद्वारे आपला संबंध भगवंतांशी पुनर्प्रस्थापित करणे हा मनुष्यजीवनाचा खरा उद्देश आहे. सर्व कार्ये सुरळीत पार पाडूनही आपल्या सर्वोच्च ध्येयापासून आपण वंचित राहील्यास काय लाभ आहे?

भगवान श्रीकृष्ण गीतेत (२.४०) सांगतात :

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्॥

''या प्रयत्नात कोणतेही नुकसान किंवा ऱ्हास नाही आणि या मार्गातील अल्प प्रगतीनेही मनुष्याचे मोठ्या, भयंकर भयापासून संरक्षण होऊ शकते.''

भक्तिमार्गाचा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या साधकाने थोडीदेखिल प्रगती केली तरी त्याचे मोठया भयापासून रक्षण होते. हे मोठे भय काय आहे? तर, नीच योनीत पतन होऊन पुन्हा जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत राहणे. भगवद्भावना विरहीत जीवनामुळे मनुष्य कर्मबंधनामध्ये अडकतो व अनेकानेक योनींमध्ये विविध शरीरे प्राप्त करतो. तुकाराम महाराज म्हणतात – *एक एक योनी। कोटी कोटी फेरा॥* जीवाला एका योनीमध्येही अनेकवेळा जन्म घ्यावा लागतो. अशारितीने अंतत: त्याला दुर्लभ मानव जन्म प्राप्त होतो. परंतु, भगवान श्रीकृष्ण आपल्याला हमी देतात की, थोडीदेखिल भक्ती केल्याने त्या व्यक्तीचे अध:पतनापासून रक्षण होते, *स्वल्पमप्यस्य धर्मस्य.*

भौतिक स्तरावर केलेले कोणतेही कर्म पूर्ण करावेच लागते, नाहीतर त्यासाठी केलेले सारे प्रयत्न निष्फळ ठरतात. परंतु, कृष्णभावनेत प्रारंभ केलेले कर्म जरी पूर्ण झाले नाही तरी त्याचा परिणाम शाश्वत काळासाठी राहतो. समजा एखाद्याने या जन्मात ३० टक्के भक्ती केली तर ती भक्ती त्याच्या पुढील जन्मात नष्ट न होता तेथून पुढे सुरू होते. यासंबंधी

श्रीमद्भागवतात (१.५.१७) एक सुंदर श्लोक आहे – ''जर एखादा आपल्या नियत कर्माचा त्याग करून कृष्णभावनेमध्ये कर्म करतो आणि अशा कर्माची पूर्तता न झाल्यामुळे पतित होतो तर यामध्ये त्याचा काय तोटा होणार आहे? आणि ज्याने आपली भौतिक कर्मे पूर्ण केली आहेत त्याचा त्याला काय फायदा होणार आहे?'' किंवा, येशू ख्रिस्त म्हणतात त्याप्रमाणे, मनुष्याला जरी सर्व जगाची प्राप्ती झाली पण शाश्वत आत्माच जर गमवावा लागला, तर त्या मनुष्याचा त्यात काय लाभ आहे?

भक्तिमार्गाचा स्वीकार करण्यासाठी आपल्याला बरेच काही त्याग करावे लागेल का? संपूर्ण जीवनशैलीच बदलावी लागेल का? खरे पाहता त्याग करण्यासाठी मुळात आपले आहे तरी काय? *इशावास्यमिदं सर्वम्।* सर्व काही भगवंतांच्या मालकीचे आहे. त्यामुळे आपल्याला 'मी' आणि 'माझे' या संकल्पनेचा मात्र निश्चितच त्याग करावा लागेल. जीवनशैलीमध्ये बदल करण्याबाबत चैतन्य महाप्रभू म्हणतात, *स्थाने स्थिता श्रुतिगताम् तनु वाक्मनोभिर्* – ''आपण आहोत त्या परिस्थितीत राहून काया, वाचा आणि मनाने भगवत्सेवेत संलग्न व्हावे.'' भक्तिमार्ग म्हणजे केवळ शुष्क तर्कवादाच्या आधारे केवळ त्याग करणे नसून आपल्या शाश्वत आनंदी जीवनाच्या अभिव्यक्तीचा राजमार्ग आहे. म्हणूनच भक्ती म्हणजे काही तोडणे, सोडणे आदी नसून साक्षात भगवान श्रीहरींना आपल्या जीवनात जोडणे होय.

आपण चिकित्सक बुद्धीने विचार केला की, मला जीवनात भक्तिमार्गामुळे केलेल्या बदलांच्या मोबदल्यात काय मिळेल तरीही याचे उत्तर समाधानकारकच असेल. अर्जुनानेसुद्धा भगवान श्रीकृष्णांना प्रश्न विचारला: हे कृष्ण! जो आरंभी आत्म-साक्षात्कारच्या मार्गाचा श्रद्धेने स्वीकार करतो; परंतु, नंतर सांसारिक आसक्तीमुळे मार्गभ्रष्ट होतो आणि यामुळे योगसिद्धी प्राप्त करू शकत नाही, अशा अयशस्वी योग्याला कोणती गती प्राप्त होते. तो छिन्नविछिन्न ढगाप्रमाणे पतित होऊन भ्रष्ट तर होत नाही ना?'' यावर श्रीकृष्ण म्हणतात : ''हे पार्था! शुभकार्यामध्ये युक्त झालेल्या योग्याचा इहलोकात तसेच परलोकातही विनाश होत नाही. असा भ्रष्ट योगी गुणवान कुटुंबामध्ये किंवा वैभवशाली कुटुंबामध्ये जन्म घेतो. अशाप्रकारे तो परिपूर्ण सिद्धी प्राप्त करण्यासाठी पुन्हा प्रयत्न करतो.''

भगवान श्रीकृष्ण एक प्रेमळ पिता आहेत. त्यांची सदैव इच्छा आहे की या भौतिक जगातील बद्ध जीवांनी त्यांच्या भक्तीचा आश्रय घेऊन अध्यात्मिक जगतामध्ये शाश्वतरीत्या आनंदी राहावे. आपण मात्र या जगामध्येच सुख दु:खांची गोळाबेरीज करण्यात गुंतले असतो आणि आपले परम कल्याण विसरतो. म्हणूनच भगवान श्रीकृष्णांनी भक्तिमार्गासारखा उदात्त तसेच पालन करण्यास सुलभ मार्ग प्रदान केला आहे. भगवद्भक्तांच्या संगतीमध्ये श्रवण किर्तन आणि सेवा केल्याने आपल्या व्यावहारीक जबाबदाऱ्या पार पाडतही आपण कृष्णभावनाभावित जीवन व्यतीत करू शकतो. केवळ भौतिक जीवनामध्ये अधिकाधिक सूखी होण्याचा प्रयत्न म्हणजे एखाद्या दिवाळखोर बँकेमध्ये सर्व धन गुंतविण्याप्रमाणे आहे, कारण मृत्युवेळी सर्वकाही हिरावून नेले जाणार आहे. आपण गुरु-साधू-शास्त्र यांच्या आधारे भगवंतांना केंद्रस्थानी ठेवून आपली विहित कर्तव्ये भगवंतांची सेवा म्हणून करत असू, तर हे कार्य भक्तिमय कार्य ठरते आणि आपल्याला शाश्वत अध्यात्मिक लाभ प्राप्त होतात. सर्व उपभोगाच्या सोयीसुविधा असूनही मानवसमाज भक्तिशिवाय पोखरला जात आहे. बहूतांश समाज हा व्यसनाधीनता, चंगळवाद, हिंसाचार, निराशा, आत्महत्या या आणि अशा दुष्ट चक्रात अडकलेला आहे. भक्तिमय जीवनामूळे एक चारित्र्यवान, निस्वार्थी, समाधानी आणि उच्च आदर्श असेलेले व्यक्तिमत्व घडते, जी आजच्या समाजाची नितांत आवश्यकता आहे. यास्तवच आपण यथाशक्ती भक्तिमय जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या उदाहरणाद्वारे तसेच इतरांनाही याचे ज्ञान प्रदान करून आपण आपले जीवन संपूर्णत: सार्थक करू शकतो. यामध्ये कोणाचाही तोटा तर नाहीच केवळ फायदाच फायदा आहे. हरे कृष्ण.

भक्ती म्हणजे काही तोडणे, सोडणे आदी नसून साक्षात भगवान श्रीहरींना आपल्या जीवनात जोडणे होय.

आपले वार्षिक सदस्यत्व संपले तर नाही ना ?



काय आपण हे जाणता का, की आपले 'जाऊ देवाचिया गावा' चे वार्षिक सदस्यत्व केव्हा समाप्त होत आहे?

ज्या पाकीटातून 'जाऊ देवाचिया गावा' मासिक आपल्याकडे येते, त्याच्या मध्यभागी चिकटविलेल्या लेबलावर आपला पत्ता लिहीलेला असतो. त्या लेबलच्या ऊजव्या कोपऱ्यात सदस्यत्व समाप्त होण्याचे वर्ष आणि शेवटचा महीना छापलेला असतो. कृपया या तारखेपूर्वी आपले सदस्यत्व वाढवून घ्या, ज्यामुळे आपण आध्यात्मिकतेच्या मार्गावर अखंडपणे या अद्भुत मित्राचे मार्गदर्शन प्राप्त करत रहाल.

एक कृष्णभावनाभावित दिवस

– युगावतार दास

आम्ही आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे सदस्य आहोत, हे आपण किती छातीठोकपणे सांगतो. पण, कृष्णभावनाभावित होणे म्हणजे नक्की काय? एकदा श्री श्री राधा-गोपीनाथ मंदिरामध्ये मी श्रीमान दामोदर पंडित दास यांचे प्रवचन ऐकले. या प्रवचनामध्ये त्यांनी एक काल्पनिक उदाहरण दिले – ''विचार करा – जर तुम्हाला श्रीकृष्णांनी स्वप्नामध्ये येऊन सांगितले की उद्या दुपारी ते तुमच्या घरी राजभोग स्वीकारण्यासाठी येत आहे. दुसऱ्या दिवशी तुम्ही सकाळी उठाल ते श्रीकृष्णांचा विचार करीतच. तुम्ही स्नान करताना, दात घासताना, शरीर पुसताना एकच विचार कराल – हे शरीर मला साफ करायचे आहे, कारण या शरीराने मला श्रीकृष्णांची सेवा करायची आहे. त्यानंतर कपडे घालण्यापासून तिलक लावेपर्यंत आपण सर्व क्रियाकर्म श्रीकृष्णांप्रित्यर्थ करू. त्यानंतर भाजी आणायला बाजारात जाऊ तेव्हा श्रीकृष्णांसाठी भाजी विकत घेऊ. भाजी कापताना, बनविताना ही भाजी श्रीकृष्णांसाठी बनवित आहोत याचे ध्यान ठेऊ. आणि, जेव्हा श्रीकृष्ण येतील तेव्हा धूप, दीप, चामर अर्पण करून त्यांना राजभोग देऊ. श्रीकृष्ण निघून गेल्यानंतर त्यांच्या उच्चिष्ट अन्नाचे अगदी प्रेमाने सेवन करू. शेवटी रात्री झोपताना श्रीकृष्णांचा विचार करीत झोपी जाऊ. असा असेल आपला एक कृष्णभावनाभावित दिवस.''



वास्तविक पाहता, आपण रोजच अशा कृष्णभावनेचे अस्वादन करू शकतो. आपणा सर्वांच्या घरी श्रीकृष्ण मूर्तीच्या किंवा चित्राच्या रूपात असतात. ते रोज आपण अर्पण केलेले अन्न स्वीकारतात. आपण जेव्हा हरिनामाच्या स्वरूपात त्यांना हाक मारतो तेव्हा ते साक्षात आपल्यासमोर येऊन उभे राहतात; पण, आपण मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. भाजी आणताना आपण आपली आवडती भाजी आणतो. भाजी बनविल्यानंतर आपण त्याचा भोग श्रीकृष्णांना दाखवितो. पण, प्रश्न असा आहे की, आपण खरोखर श्रीकृष्णांच्या प्रसन्नतेखातर स्वयंपाक करतो का? केलेला स्वयंपाक श्रीकृष्णांना अर्पण करणे आणि श्रीकृष्णांसाठी स्वयंपाक करणे, यामध्ये फरक आहे. कीर्तनामध्ये आनंद मिळतो म्हणून नाचणे आणि श्रीकृष्णांच्या आनंदासाठी नाचणे, यामध्ये फरक आहे. जर आपण आपले प्रत्येक कार्य श्रीकृष्णांप्रित्यर्थ केले, तर भाजी आणणे, भाजी कापणे, आंघोळ करणे, अशा साध्या वाटणाऱ्या कार्यामधून देखील आपण आध्यात्मिक प्रगती करू शकतो.

अशा प्रकारे प्रत्येक दिवस हा श्रीकृष्णांना भेटण्याची, त्यांची सेवा करण्याची एक सुवर्णसंधी आहे, असे समजून आपण कृष्णभावनाभावित व्हावे. मगच आपण कृष्णभावना आंदोलनाचे सदस्य आहोत, असे छातीठोकपणे सांगू शकतो.

भगवान परशुरामांची क्रांती

प्राचीनकाळी भगवंतांच्या एका शक्त्यावेश अवताराने भ्रष्ट राज्यकर्त्यांना वटणीवर आणण्यासाठी अत्यंत पराकोटीचे पाऊल उचलले.

– अजगोविंद दास

राजकीय नेत्यांद्वारे अत्याचार हा आत्ताचाच प्रकार नसून अगदी भगवान परशुराम प्रकट होते त्या काळात देखील असा अत्याचार राज्यकर्त्यांकडून होत होता. परशुराम हे भगवंतांच्या शक्त्यावेश अवतार असून भगवान रामचंद्रांच्या जवळजवळ कोट्यवधी वर्षांपूर्वी भूतलावर प्रकट झाले होते. त्यावेळी आपल्या सामर्थ्यामुळे मदमत्त झालेल्या राज्यकर्त्यांनी शासनाला आध्यात्मिक मार्गदर्शन करणाऱ्या ऋषींवरच अत्याचार करण्यास सुरुवात केली होती. धर्माचा मार्ग सोडून भगवान श्रीकृष्णांच्या भक्तांना त्रास देऊ लागलेल्या या राज्यकर्त्यांना दंडित करणे आवश्यक झाले होते. भगवान परशुरामांनी हे कार्य पूर्ण केले. ब्राह्मण कुटुंबात जन्मले असले तरी त्यांनी धनुर्विद्येतील कौशल्य प्राप्त केले, कारण त्यांना भविष्यामध्ये साधूसंतांवर अत्याचार करणाऱ्या भ्रष्ट राज्यकर्त्यांना धडा शिकवायचा होता.

भगवान परशुरामांनी या राज्यकर्त्यांविरुद्ध क्रांती करण्याचे का ठरविले?

एकदा एक राजा शिकार करताना परशुरामांच्या पित्याच्या आश्रमाजवळ आला. या राजाला ब्राह्मणांप्रती द्वेष होता तरीही या ऋषींनी राजाचे स्वागत करून त्याचे आणि त्याच्या सहकाऱ्यांचे अगदी उत्तमरीत्या आदरातिथ्य केले. एका ऋषीकडून अगदी स्वर्गीय आदरातिथ्य झाल्याचे पाहून राजाला मत्सर वाटू लागला. राजाने जाणले की ऋषीकडे कामधेनू गाय असल्याने तो इतक्या उत्तमप्रकारे सर्वांची सेवा करू शकला. राजाने ऋषीला ती कामधेनू गाय देण्याचा आदेश दिला; परंतु, राजा त्या कामधेनूचा गैरफायदा घेईल, हे जाणलेल्या ऋषीने असे करण्यास विरोध केला. ऋषीच्या विरोधाला न जुमानता राजाने ती कामधेनू बळजबरीने आपल्या राज्यात घेऊन गेला.

अशा अत्याचारी राजाला शासन करून कामधेनूला परत आणण्यासाठी परशुरामांनी आक्रमक पावित्रा घेऊ राजाच्या महालाच्या दिशेने आगेकूच केली. शास्त्र सांगतात की, परशुराम अगदी मनाच्या वेगाने राजाच्या भल्यामोठ्या सैन्याला कापून काढत राजाच्या महालापर्यंत पोहोचले. राजाने परशुरामांवर अनेक बाण सोडण्याचे प्रयत्न केले; परंतु ते सोडण्याअगोदरच परशुरामांनी त्या बाणांचे तुकडे तुकडे करून टाकले. हे पाहून अत्यंत क्रोधाविष्ठ झालेल्या राजाने निरनिराळ्या प्रकारे परशुरामांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र परशुरामांनी अत्यंत कुशलतेने त्याला प्रतिउत्तर देत शेवटी त्याचे शीर धडावेगळे केले. सिंह हत्तीला परास्त करतो, त्याप्रमाणे परशुरामांनी राजाला पराभूत केले आणि कामधेनू घेऊन वडलांकडे परतले.

कामधेनू परत मिळविण्यासाठी परशुरामांनी केलेला रक्तपात त्यांच्या क्षमाभावी असलेल्या वडलांना आवडला नाही. परशुराम मात्र, न्याय प्रस्थापित करण्यासाठी युद्ध करण्यास मागेपुढे पाहणारे नव्हते.





एका कृष्णभावनाभावित भक्ताने वरीलपैकी कोणाचा आदर्श घ्यावा – एकतर येशू ख्रिस्तांप्रमाणे सर्व अत्याचार सहन करावेत की अर्जुनाप्रमाणे युद्ध करावे? वैदिक तत्त्वानुसार, स्वत:चा वैयक्तीक अपमान झाला असता वैष्णवाने तो सहन करावा; परंतु, एखादा भगवंत, वेद, ऋषी, स्त्रीया, गाय, वृद्ध किंवा अशक्त व्यक्तीची निंदा अथवा त्यांच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा मात्र वैष्णवाने अपराध्याला शासन करणे उचित आहे.

कामधेनू गायीचे रक्षण करण्यासाठी परशुरामांनी युद्ध करून योग्यच कार्य केले नव्हते. परंतु, त्यांनी भगवंतांचा प्रतिनिधी आणि प्रजेचा पालक असणाऱ्या राजाची हत्या केल्याने त्यांच्या वडलांनी त्यांना पवित्र तीर्थस्थळांना भेटी देऊन प्रायश्चित करण्यास सांगितले. एक आदर्श प्रस्थापित करण्यासाठी परशुरामांनी वडलांच्या आदेशाचे पालन केले. या कथेवरून आपण जाणू शकतो की शक्यतो हिंसा ही टाळळीच पाहिजे; परंतु, न्याय किंवा धर्माच्या रक्षणासाठी अगदी आवश्यक असेल तेव्हाच हिंसेचा वापर करावा.

राजपुत्रांद्वारे राजाच्या मृत्यूचा बदला

परशुराम तीर्थयात्रेला गेल्याचे पाहून त्या संधीचा फायदा घेत राजाच्या पुत्रांनी परशुरामांच्या वडलांचे शीर धडावेगळे करून त्यांचा वध केला. यावेळी ऋषीच्या पत्नीद्वारे केलेल्या विनंतीला न जुमानता त्यांनी हे निर्दयी कृत्य केले. भगवंतांचे पिता असलेल्या आणि स्वत: या महान ऋषीची हत्या कशी काय होऊ शकते? हे ऋषीने पूर्वी केलेल्या एका अपराधी कर्माचे फळ होते. एकदा परशुरामांची माता पाणी भरण्यासाठी नदीवर गेली असता तेथे अनेक स्त्रीयांसमवेत जलक्रिडा करणाऱ्या राजकुमाराकडे तिचे मन आकर्षित झाले. तिला त्या राजकुमाराशी सहवास करण्याची इतकी तीव्र इच्छा झाली की तिचा पती यज्ञ संपन्न करण्यासाठी तिची वाट पाहत असल्याचे ती

विसरूनच गेली. ती घरी आल्यावर ऋषी असलेल्या तिच्या पतीने तिच्या मनात आलेला व्यभिचारी विचार जाणला. यामुळे क्रोधाविष्ट झालेल्या ऋषीने आपल्या पुत्रांना मातेचा वध करण्याचा आदेश दिला.

वडलांनी दिलेला आदेश ऐकून पुत्रांना काय करावे ते समजेना. वैदिक शास्त्रांनुसार एका स्त्रीचा (मग ती स्त्री स्वत:ची माता असेल तर काय म्हणावे?) वध करणे पापकृत्य आहे. दुसऱ्या बाजूला वडलांसारख्या वरिष्ट जनांचा आदेश न पाळणे, हे देखील मोठे पाप आहे. ऋषीच्या गोंधळलेल्या पुत्रांनी जेव्हा असे करण्यास नकार दिला तेव्हा ऋषींनी आपल्या सर्वात छोट्या पुत्राला, परशुरामांना त्याची माता आणि बांधवांचा वध करण्याचा आदेश दिला.

परशुरामांना माहीत होते की अत्यंत महान ऋषी असलेल्या त्यांच्या वडलांकडे माता आणि बांधवांना पुन्हा जीवित करण्याचे सामर्थ्य आहे. त्यामुळे क्षणाचाही विलंब न करता परशुरामांनी वडलांच्या आदेशाचे त्वरित पालन केले.

परशुरामांची आज्ञाधारकता पाहून प्रसन्न झालेल्या त्यांच्या वडलांनी कोणताही वर मागण्यास सांगितले. परशुरामांनी त्यांची माता आणि बांधवांना पुनर्जीवित करण्याचा आणि त्यांना घडलेल्या प्रसंगाची कोणतीही आठवण राहू नये, असा वर मागितला. आता क्रोध सावरलेल्या ऋषीनी आपल्या पत्नी आणि पुत्रांना पुनजीर्वित केले, जे असे काही उभे राहिले जणूकाही ते गाढ निद्रेतून जागे झाले आहेत.

ऋषीनी आपली पत्नी आणि मुलांचा वध करण्याची आज्ञा दिल्यामुळे त्यांना या कर्माचे फळ म्हणून त्यांचा राजपुत्रांकडून वध करण्यात आला.

भगवंत, त्यांचे भक्त, त्यांचे अवतार यांच्या लीला दिव्य स्तरावरील असल्याने आपण त्यांचे अनुकरण करू नये. परंतु, परशुरामांच्या या कथेतून आपण हा बोध घेऊ शकतो की काम, क्रोध यासारखे अनर्थ भगवदावतार असणाऱ्या परशुरामांच्या पालकांना देखील प्रभावित करू शकतात, तर मग आपली काय स्थिती आहे?

परशुरामांची क्रांती

राजपुत्रांनी ऋषीवर आक्रमण केले असता परशुरामांची माता मोठमोठ्याने विलाप करीत त्यांचा धावा करू लागली. मातेचा हा आक्रोश ऐकून परशुराम आश्रमाच्या ठिकाणी पोहोचले खरे; परंतु ते येण्याआधीच राजपुत्र त्यांच्या पित्याचे धडावेगळे केलेले शीर घेऊन पळाले होते. या राजपुत्रांचे हे अघोरी कृत्य पाहून परशुरामांनी त्याचवेळी सर्व अधार्मिक राज्यकर्त्यांचा समूळ नायनाट करण्याचा निर्धार केला.

त्यांनी राजाच्या राजधानीपासूनच आपल्या या क्रांतीला सुरुवात केली. तेथे त्यांनी विरोधक राज्यकर्ते आणि त्यांच्या सैन्याला कापून काढले. त्यावेळी परशुरामांनी इतक्या दुर्जनांना ठार केले की त्यामुळे रक्ताची नदी वाहू लागली आणि त्यामध्ये या भ्रष्ट राज्यकर्ते आणि त्यांच्या सैन्याची

भगवंतांच्या अवतारांचे सहा प्रकार आहेत – (१) *पुरुषावतार* – जे सर्वव्यापी असून विश्वाचे नियंत्रक आहेत (महाविष्णू, गर्भोदशशायी विष्णू, क्षीरोदकशायी विष्णू), (२) *लीलावतार* – जे विविध लीला करण्यासाठी भौतिक जगतात अवतरित होतात (मत्स्य, कुर्म, वराह इत्यादी), (३) *गुणावतार* – जे भौतिक प्रकृतीच्या गुणांचे नियंत्रण करतात (ब्रह्मा–विष्णू–महेश), (४) *मन्वतरावतार* – जे प्रत्येक मनूच्या जीवनकाळात प्रकट होतात, (५) *युगावतार* – जे प्रत्येक युगातील युगधर्म प्रस्थापित करण्यासाठी प्रकट होतात, आणि (६) *शक्त्यावेश अवतार* – जे भगवंतांद्वारे विशेष शक्ती प्रदान केलेले अवतार आहेत.

परशुराम हे लीलावतार तसेच शक्त्यावेश अवतार म्हणून स्वीकारले जातात. दुष्ट राज्यकर्त्यांचा नायनाट करणे, हे त्यांच्या अवताराचा उद्देश होता *(दुष्ट दमन शक्ती).*

शक्त्यावेश अवतार हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या भगवंतांचे अवतार असतात. जेव्हा स्वत: भगवंत एखादी विशेष शक्ती प्रकट करतात तेव्हा त्याला त्याला *प्रत्यक्ष शक्त्यावेश अवतार* म्हटले जाते. परंतु, जेव्हा ते एखाद्या जीवात्म्याला विशेष शक्ती प्रदान करून एखादे कार्य संपादन करण्यासाठी भूतलावर पाठवितात तेव्हा त्याला *अप्रत्यक्ष शक्त्यावेश अवतार* म्हटले जाते.

भगवद्गीतेत (१०.३१) भगवान श्रीकृष्ण म्हणतात, ''शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये राम मी आहे.'' याविषयी वैष्णव टीकाकार श्री बलदेव विद्याभूषण लिहितात की, या श्लोकातील 'राम' म्हणजे 'अयोद्धा राम' नसून शस्त्र धारण करण्यामध्ये निपूण असलेले 'परशुराम' आहेत.

छिन्नविछिन्न झालेली शरीरे तरंगत होती. या रक्तपातामुळे कुरुक्षेत्र येथे रक्ताचे तलाव भरले. याच कुरुक्षेत्रात पुढे महाभारताचे युद्ध होणार होते. बाराव्या शतकातील महान वैष्णव कवी, श्री जयदेव गोस्वामी लिहितात : ''हे केशव! हे विश्वनाथ! हे श्रीहरी! आपण भृगूपतीचे (परशुराम) रूप घेऊन अवतार घेतला आहे. आपला जयजयकार असो! आपण कुरुक्षेत्र येथे आसुरी राज्यकर्त्यांचा संहार करून त्यांच्या रक्ताचा धरणीला अभिषेक घातला आहे. आपल्यामुळे जगातील सर्व पापे नष्ट झाली आहेत. अशा प्रकारे भौतिक अस्तित्वाच्या धगधगत्या अग्नीपासून आपण लोकांचे रक्षण केले आहे.''

आपले कार्य पूर्ण केल्यावर परशुरामांनी भगवान श्रीकृष्णांकडे वडलांना उच्चगती प्राप्त होण्यासाठी प्रार्थना केली आणि ते तपश्चर्या करण्यासाठी वनात निघून गेले.

आवश्यक हिंसा

परशुरामांनी इतक्या लोकांना वध का केला? युद्धापेक्षा शांती प्रस्थापित करणे चांगले नाही का? या महासंहारामुळे अनेक कुटूंबे उध्वस्त झाली असतील, अनेक मुले अनाथ झाली असतील, शहरे जमिनदोस्त झाली असतील आणि समाजव्यवस्था ढासळली असेल. गीतेच्या पहिल्या अध्यायात अर्जुन विचारतो त्याप्रमाणे या युद्धापासून कोणता चांगला परिणाम साधता आला असता?

वरकरणी परशुरामांनी केलेला संहार समाजातील शांती भंग करणारा प्रतित होऊ शकतो. खरेतर, अत्याचार करणाऱ्या भ्रष्ट राज्यकर्त्यांविरुद्ध त्यांचा लढा होता. अशा राज्यकर्त्यांनी माजविलेल्या थैमानामुळे त्यांचे दमन करून शांती प्रस्थापित करणे आवश्यक होते. भक्तांचे रक्षण करण्याचे आपले वचन पूर्ण करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी परशुरामांच्या रूपात साधूसंतांवर अत्याचार करणाऱ्या राज्यकर्त्यांचा नायनाट केला. भगवंतांचे भक्त नेहमी लक्ष्मीपती असलेले भगवान श्रीकृष्णांची सेवा करीत समाजामध्ये शांती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा साधू लोकांवर जेव्हा हे राज्यकर्ते अन्याय करू लागले, तेव्हा त्यांचा अंत करणे आवश्यक बनले होते.

परशुराम युद्ध टाळून अहिंसेद्वारे ही परिस्थिती हाताळू शकले नसते का? अशाच एका प्रसंगाविषयी लिहिताना श्रील प्रभुपाद म्हणतात, ''भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचा नित्य सखा अर्जुन यांना कुरुक्षेत्राच्या युद्धामध्ये लढण्याची आवश्यकता नव्हती; परंतु त्यांनी युद्ध केलेच, कारण त्यांना सामान्य लोकांना हेच शिकवायचे होते की, ज्याठिकाणी चांगला प्रतिवाद विफल होतो तेव्हा हिंसेचीही आवश्यकता असते. कुरुक्षेत्राच्या युद्धापूर्वी स्वत: भगवंतांनी युद्ध टाळण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न केले होते; पण विपक्ष युद्ध करण्यासाठी निश्चयी होता. यास्तव अशा योग्य कारणासाठी युद्धाची आवश्यकता असतेच.'' (भगवद्गीता ३.२० – तात्पर्य) परशुरामांच्या वेळी अहिंसेचा प्रश्नच उद्भवत नव्हता, कारण त्या राज्यकर्त्यांनी कोणत्याही चांगल्या सल्ल्याला न जुमानता आपला अत्याचार चालूच ठेवला होता. सुरुवातीला साधूसंतांनी या राज्यकर्त्यांचा अत्याचार सहन केला; परंतु जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली तेव्हाच परशुरामांनी त्यांना वध करण्याचा ठरविले.

भगवंत किंवा त्यांच्या अवताराच्या हातून एखादा मारला जातो, तेव्हा त्याला मुक्ती प्राप्त होते. हाच श्रीकृष्ण आणि आपल्यातील फरक आहे. आपण एखाद्याची हत्या केली तर ते पापमय कृत्य ठरते; परंतु, श्रीकृष्ण एखाद्याची हत्या करतात तेव्हा त्यांना कोणतेच पाप लागत नाही. श्रीकृष्ण कधीच स्वत:च्या वैयक्तिक स्वार्थासाठी कार्य करीत नाहीत. भगवद्गीतेत (४.१४) ते म्हणतात – ''कोणत्याही कर्माने मी बद्ध होत नाही तसेच मला कर्मफलाची आकांक्षाही नाही.'' भगवंत दिव्य स्तरावर स्थित आहेत आणि जो कोणी त्यांना वास्तविकरीत्या जाणतो, तो आपल्या भौतिक जगातील कार्यांद्वारे प्रभावित होत नाही – अगदी कमळ चिखलात उगवत असले तरी त्याला चिखलाचा स्पर्श होत नाही, त्याप्रमाणे.

भगवान श्रीकृष्णांचे प्रत्येक कार्य हे पूर्ण आहे. त्यांचे मारणे अथवा प्रेम करणे – यात काहीच फरक नाही. प्रत्येक स्थितीत ते जीवांवर कृपा करीत असतात. भक्त भगवंतांची आराधना करण्यासाठी त्यांच्याजवळ जातो तर आसुरी प्रवृत्ती असलेला व्यक्ती त्यांच्यावर शस्त्राद्वारे आक्रमण करण्याचा प्रयत्न करतो. जो ज्या भावात भगवंतांकडे येतो त्याप्रकारे भगवंत त्याच्याशी व्यवहार करतात. स्वत: भगवंतांविरुद्ध शत्रुत्व पत्करणाऱ्यांना ते मृत्यूदंड देतात आणि प्रेमळ भक्तांना आशीर्वाद देतात. भगवंतांद्वारे मारले जाणे ही देखील त्यांची कृपाच आहे, कारण अशा व्यक्तीला जन्म–मृत्यूच्या चक्रातून कायमची मुक्ती प्राप्त होते. भक्त आणि असूर दोघेही भगवंतांचे शाश्वत अंश असल्याने भगवंतांचे दोघांवरही प्रेम आहे. भगवंत आसुरांना मारतात तेव्हा त्यांच्या स्पर्शामुळे तो जीवात्मा शुद्ध होऊन त्याला मुक्ती प्राप्त होते व तो त्यांच्या अस्तित्वात विलीन होतो.

परशुरामांच्या काळ असो वा सध्याचे आधुनिक युग, जेव्हा कधी दुष्ट लोक समाजात गोंधळ माजवितात तेव्हा भगवंत एकतर स्वत: अवतरित होतात, नाहीतर एखाद्या जीवात्म्याला विशेष शक्ती प्रदान करून दुष्टांचा विनाश आणि साधूंचे रक्षण करण्यासाठी पाठवितात. ज्याप्रमाणे भगवंतांचा शक्त्यावेश अवतार असणाऱ्या परशुरामांनी परशू धारण करून दुष्टांचा नायनाट केला, त्याचप्रमाणे आजच्या युगात भगवंतांचे शुद्ध भक्त असलेल्या श्रील प्रभुपादांनी आपल्या वाणीद्वारे नास्तिक तत्त्वज्ञानावर आक्रमण केले आहे. यामुळे अनेक नास्तिकवादी आता भगवद्भक्त बनले आहेत. ज्याप्रमाणे परशुराम आजदेखील पर्वतांमध्ये तपश्चर्या करीत आहेत, त्याचप्रमाणे श्रील प्रभुपाद देखील त्यांच्या शिकवणीद्वारे आपणासर्वांमध्ये उपस्थित आहेत.

अजगोविंद दास हे प. पू. हनुमतप्रेशक गोस्वामींचे शिष्य असून ते ऑक्सफर्ड विद्यापीठात पी.एच.डी करीत आहेत.

आद्य निर्मात्याला श्रेय द्या

३ डिसेंबर १९७३ रोजी प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर लॉस एंजिलिस येथे डॉ. डब्ल्यू. एच. वोल्फ रोटके, डॉ. सिंग, इतर शिष्य आणि श्रील प्रभुपाद यांच्यामध्ये झालेला वार्तालाप



डॉ. सिंग : शास्त्रज्ञ म्हणतात की, एके काळी पृथ्वी ही कोणत्यातरी वायुमय पदार्थामध्ये तरंगणाऱ्या धुलिकणांनी बनलेली होती. नंतर, कालांतराने हे धुलिकणांचे मिश्रण केंद्रिभूत झाले आणि पृथ्वी निर्माण झाली.

श्रील प्रभुपाद : तसे असू शकेल, परंतु हा वायू कोठून आला?

डॉ. सिंग : तो आधीपासून अस्तित्वात असल्याचे ते म्हणतात.

श्रील प्रभुपाद : श्रीकृष्ण भगवद्गीतेत (७.४) म्हणतात –

भूमिरापोऽनलो वायु: खं मनो बुद्धिरेव च।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा।।

''पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार या आठ भिन्न प्राकृतिक शक्ती आहेत.'' येथे श्रीकृष्ण स्पष्ट करतात की, वायूचा उद्गम त्यांच्यापासून होतो. वायूपेक्षाही सूक्ष्म आकाश आहे, आकाशापेक्षाही सूक्ष्म मन आहे, मनापेक्षाही सूक्ष्म बुद्धी, बुद्धीपेक्षा सूक्ष्म मिथ्या अहंकार आणि मिथ्या अहंकारापेक्षाही सूक्ष्म आत्मा आहे. परंतु, शास्त्रज्ञांना ते माहीत नाही. त्यांना केवळ स्थूल पदार्थांचे ज्ञान आहे. ते वायूचा उल्लेख करतात; परंतु वायूचे स्रोत कोण आहे?

डॉ. सिंग : याचे उत्तर ते देऊ शकत नाहीत.

श्रील प्रभुपाद : परंतु, आम्ही याचे उत्तर देऊ शकतो. भागवताच्या आधारावर आम्ही सांगू शकतो की, वायू आकाशापासून प्रकट होतो, आकाश मनापासून निर्माण होते, मन बुद्धीपासून, बुद्धी मिथ्या अहंकारापासून आणि मिथ्या अहंकार हा आत्म्यापासून निर्माण होतो.

डॉ. सिंग : शास्त्रज्ञ असा वाद घालतात की, डार्विनची जीवभौतिक प्रकारची उत्क्रांती घडून येण्यापूर्वी जीवनपूर्व रसायन किंवा रासायनिक उत्क्रांती घडून येणे आवश्यक होते.

श्रील प्रभुपाद : होय, आणि 'रासायनिक उत्क्रांती' शब्दाचा अर्थ असा की, रसायनांना उगमस्थान आहे आणि ते उगमस्थान म्हणजे जीवात्मा किंवा जीवन. एक लिंबू सायट्रिक आम्ल निर्माण करतो आणि आपले देह मूत्रामध्ये, रक्तात आणि शारीरिक स्रावांच्या रूपात अनेक रसायने निर्माण करतात. रसायनांपासून जीवन निर्माण होत नाही, तर जीवनापासून रसायने निर्माण होतात – याचे हे प्रमाण आहे.

डॉ. सिंग : शास्त्रज्ञ म्हणतात की, पेशींमध्ये चेतनेचे बीज असले की, जीव आपोआप विकसित आणि कार्यरत होतो.

श्रील प्रभुपाद : होय, पण ते बीज कोण देते? भगवद्गीतेत (७.१०) श्रीकृष्ण याचे उत्तर देतात, *बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्* – ''हे पार्थ! अस्तित्वातील सर्व वस्तूंचे मी मूळ बीज असल्याचे जाण.'' आणि गीतेत (१४.४) ते सांगतात,

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तय: सम्भवन्ति या: ।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रद: पिता ।।

''हे कौंतेय! भौतिक प्रकृतीमध्ये जन्म घेऊन सर्व योनी प्रकट होत असतात आणि मी बीज प्रदान करणारा पिता आहे, हे जाणून घेतले पाहिजे.''

डॉ. वोल्फ रोटके : परंतु, श्रील प्रभुपाद, समजा शास्त्रज्ञ कृत्रिमरीत्या जीवंत पेशी बनविण्यात यशस्वी झाले, तर तुम्ही काय म्हणाल?

श्रील प्रभुपाद : त्यात त्यांचे श्रेय ते कोणते? प्रकृतीमध्ये जे पूर्वीच अस्तित्वात आहे, त्याची ते केवळ नक्कल करीत आहेत. लोकांना नकली वस्तू फार आवडतात. नाईट-क्लब मधील एकादा मनुष्य कुत्र्याची नक्कल करीत असेल तर लोक जातील आणि त्याला पाहण्यासाठी पैसे देतील. परंतु, ते जेव्हा एका खऱ्या कुत्र्याला भुंकताना पाहतात तेव्हा त्याकडे कोणीही लक्ष देत नाही.

डॉ. सिंग : श्रील प्रभुपाद, १९२० मध्ये एका रशियन जीवशास्त्रज्ञापासून रासायनिक उत्क्रांतीची कल्पना पुढे आली. त्याने सिद्धांत मांडला की, जीवरासायनिक उत्क्रांतीपूर्वी पृथ्वीचे वातावरण रूपांतरणाच्या स्थितीत होते. दुसऱ्या शब्दांत, ते अधिक हायड्रोजन आणि अगदी थोड्या ऑक्सिजनने व्यापलेले होते. नंतर, कालांतराने सूर्य किरणांमुळे या हायड्रोजनच्या रेणूंची भिन्न रसायने तयार झाली.

श्रील प्रभुपाद : तो पुढचा विषय आहे. प्रथमत: हायड्रोजन आला कोठून? शास्त्रज्ञ उगमस्थानाचा अभ्यास न करता केवळ प्रक्रियेच्या मधील भागाचा अभ्यास करतात. तेथे एक विमान आहे (प्रभुपाद क्षितीजावर दिसणाऱ्या विमानाकडे निर्देश करतात). त्या यंत्राचे उगमस्थान समुद्र आहे, असे तुम्ही म्हणाल का? एक मूर्ख मनुष्य म्हणेल की, समुद्रामध्ये अचानक प्रकाश निर्माण झाला आणि त्यायोगे विमान निर्माण झाले. परंतु, ते शास्त्रीय स्पष्टीकरण आहे का? शास्त्रज्ञांची विश्लेषणेही याच प्रकारची आहेत. ते म्हणतात, ''हे अस्तित्वात होते आणि योगायोगाने अचानक ते घडले.'' हे विज्ञान नव्हे. विज्ञान म्हणजे मूळ कारण स्पष्ट करणे.

कदाचित्, शास्त्रज्ञ प्रकृतीची नक्कल करतीलही; परंतु आपण त्यांना श्रेय का द्यावे? आपण मूळ निर्मात्याला, भगवंतांना श्रेय दिले पाहिजे, हे आमचे तत्त्वज्ञान आहे.

डॉ. सिंग : जेव्हा शास्त्रज्ञ एखाद्या प्राकृतिक नियमाचा शोध लावतो तेव्हा तो स्वत:च्या नावाने तो नियम प्रस्तुत करतो.

श्रील प्रभुपाद : होय, अगदी बरोबर. तो नियम निसर्गामध्ये पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे; परंतु, मूर्ख वैज्ञानिक त्याबद्दल श्रेय घेऊ इच्छितो.

डॉ. सिंग : खरे तर, ते प्रकृतीच्या नियमांशी लढा देत आहेत; परंतु त्यांना तो संघर्ष करण्यात नेहमी आनंद मिळतो.

श्रील प्रभुपाद : तो आनंद बालिश आहे. समजा, एक मूल अतिशय कष्टाने किनाऱ्यावर वाळूचा किल्ला तयार करीत आहे. त्याला त्यात आनंद मिळत असेल; पण तो बालिश आहे. तो मोठ्या मनुष्याचा आनंद नव्हे. भौतिकवादी लोकांनी मिथ्या आनंदाचा दर्जा निर्माण केला आहे. त्यांनी आरामदायी संस्कृतीसाठी प्रचंड योजना निर्माण केल्या आहेत; पण त्या सर्व खोट्या आहेत, कारण त्यांचा उपभोग घेता येईल अशी स्थिती ते निर्माण करू शकत नाहीत. कोणत्याही क्षणी मृत्यूद्वारे त्यांची या जगातून हकालपट्टी होऊ शकते आणि त्याचबरोबर त्यांचा सर्व आनंद संपुष्टात येईल.

डॉ. सिंग : त्यामुळेच ते म्हणतात की, परमेश्वराने आम्हाला सर्व काही दिलेले नाही, कारण आम्ही येथे सदैव राहू शकत नाही.

श्रील प्रभुपाद : परंतु, शांततामय जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तू परमेश्वराने त्यांना दिलेल्या आहेत आणि त्यांना यथारूप जाणून घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूही दिल्या आहेत. तर मग ते परमेश्वराबाबत जिज्ञासा का करीत नाहीत? त्याऐवजी ते परमेश्वराच्या विस्मरण घडविणाऱ्या गोष्टींमागे का धावत आहेत?

विद्यार्थी : सध्या जगाला तेलाचा तुटवडा जाणवत आहे.

श्रील प्रभुपाद : होय, आपण तेलावर अवलंबून असणाऱ्या समाजाची रचना केली आहे. हे प्रकृतीच्या नियमाविरुद्ध आहे आणि म्हणूनच आता तेलाची टंचाई आहे. प्रकृतीच्या नियमांनुसार आता हिवाळा येत आहे. शास्त्रज्ञ त्याला थांबवून त्याचे उन्हाळ्यात रूपांतर करू शकत नाहीत. ते चुकीने, आपण प्रकृतीचे नियंत्रक असल्याचे समजतात. भगवद्गीतेत श्रीकृष्ण आपल्याला सांगतात की, जीव स्वत:ला वास्तविकपणे प्रकृतीद्वारे केल्या जाणाऱ्या कर्मांचा कर्ता समजतो. आता सूर्योदय होत आहे. ते आता काळोख करू शकतील का? आणि जेव्हा अंधार होईल तेव्हा ते सूर्याला 'उदित हो' अशी आज्ञा करू शकतील का?

त्यांना खरोखरच प्रकृतीवर विजय मिळवावयाचा असेल तर त्यांनी जन्म, मृत्यू, जरा आणि व्याधी यांवर विजय मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.भगवद्गीतेत (७.१४) श्रीकृष्ण म्हणतात – ''तीन प्राकृतिक गुणांनी युक्त असलेली माझी दैवी मायाशक्ती ही अतिशय दुस्तर आहे. परंतु, जे मला शरण आले आहेत ते मायेला सहजपणे पार करून पलीकडे जातात.''

डॉ. सिंग : प्रकृतीच्या नियमांना पार करणे फार कठीण आहे का?

श्रील प्रभुपाद : भौतिकवाद्यांसाठी ते अशक्य आहे. परंतु, श्रीकृष्णांना शरण गेलेल्या मनुष्याला ते सहज शक्य आहे.

मैथुनामध्ये कोणता

खरे स्वातंत्र्य हे निर्धोकपणे मैथुन करण्यामध्ये नव्हे तर मैथुनावर निर्बंध घालण्यामध्ये आहे.

– चैतन्यचरण दास

आजकल प्रसारमाध्यमांतून कामुक दृष्यांचा भडीमार होत असताना समाजातील दोन वर्गांमध्ये एक वादविवाद शिगेला पोहोचला आहे. एका वर्गाचे म्हणणे आहे – ''स्वैराचारी मैथुनसंबंधात काय दोष आहे? त्याच्यावर प्रतिबंध घालून आमच्या इच्छास्वातंत्र्यावर गदा आणणारे आपण कोण?'' तर दूसरा वर्ग त्याविरुद्ध बोलताना म्हणतो – ''अशा स्वैराचारी मैथुनसंबंधाचा प्रचार समाजातील नैतिकता नष्ट करण्यास कारणीभूत ठरत आहे.''

''प्रत्येकाला त्याच्या जीवनाचा हवा तसा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य आहे'' – असे मुक्त मैथुनसंबंधाचा प्रचार करणारे आपले मत मांडतात.

परंतु, ते ज्या मताचा पुरस्कार करीत आहे त्याचा उद्देश (सुखप्राप्ती) ते खरोखरच प्राप्त करीत आहेत का?

मैथुनावरील निर्बंध जीवनाचा आनंद घेण्यास मज्जाव करतो की उलट, जीवनातील खरा आनंद प्रदान करतो?

वैदिक शास्त्रांनुसार मैथुनावरील निर्बंधाद्वारेच मनुष्य खऱ्या सुखाची प्राप्ती करू शकतो. वेदांनुसार आत्मसाक्षात्काराद्वारेच खऱ्या सुखाची प्राप्ती करता येते आणि त्यासाठी मैथुनावर निर्बंध आवश्यक आहे. मैथुनाबाबत, खऱ्या सुखाबाबत वेदांचे काय मत आहे, याविषयी थोडी विस्तृत चर्चा करुया.

वैदिक दृष्टीकोण

वैदिक जीवनपद्धतीचे आचरण करणारा व्यक्ती सांगू शकतो की आजकल समाजातील नैतिकतेचा ऱ्हास हा आध्यात्मिक ज्ञानाच्या अभावामुळेच होत आहे. भोगवाद, चंगळवादाला आसक्त असलेले आधुनिक युगातील लोक जीवनाचे उद्दिष्ट विसरले आहे. आपल्या मूळ स्वरूपाची विस्मृती झाल्याने आधुनिक मानवाला कोणत्या आधारावर नैतिकता उभारावी, हेच माहीत नाही. त्यामुळे इंद्रियतृप्तीच्या नवनवीन प्रकारांच्या भडीमारामुळे समाजातील तथाकथित नैतिकता अगदी समूळपणे नष्ट होत आहे. आध्यात्मिक ज्ञानाचा पाया नसल्यानेच नैतिकतेचा असा ऱ्हास होत चालला आहे.

इंद्रियतृप्तीमागे वेडेपिसे होऊन धावण्यापूर्वी वैदिक शास्त्रे



मैथुनावरील निर्बंध जीवनाचा आनंद घेण्यास मज्जाव करतो की उलट, जीवनातील खरा आनंद प्रदान करतो?

दोष आहे?

भौतिक देहामध्ये बद्ध झाल्यावर मूळच्या शुद्ध, निर्मळ अशा जीवात्म्यामध्ये विकृती निर्माण होऊन त्याच्यात मैथुनाच्या रूपात शरीरसुख घेण्याची इच्छा निर्माण होते.

आपणास थोडे थांबून ''मी कोण आहे?'' अशी जिज्ञासा करण्यास सांगतात. आपल्या मूळ स्वरूपाविषयी असा प्रश्न विचारला असता आधुनिक युगातील बहुतांशी लोक डोके खाजवू लागतात. वैदिक शास्त्रे मात्र आपल्या मूळ स्वरूपाविषयी स्पष्टपणे सांगतात की, – आपण हे भौतिक शरीर नसून चेतन आत्मा आहोत. सध्या आपण या भौतिक देहामध्ये बद्ध झालो आहोत. आपण मूळचे आध्यात्मिक जगातील निवासी असून तेथे भगवान श्रीकृष्णांची प्रेममय सेवा करण्यातच खरे सूख आहे. परंतु, आपल्या अल्पस्वातंत्र्याचा गैरवापर करीत श्रीकृष्णांपासून विमुख झाल्याने आपण या भौतिक जगात पतित झालो आहोत. भौतिक जगात आल्यावर आपण निरनिराळ्या योनींमध्ये शरीर धारण करतो आणि त्याच्याशी तादात्म्य करतो. आध्यात्मिक स्वरूप स्थितीची विस्मृती झाल्यानेच आपण क्षणभंगुर अशा भौतिक सुखांमागे धावू लागतो.

प्रकाशकिरण लाल काचेतून जाऊ दिल्यास दुसऱ्या बाजूने लाल प्रकाश बाहेर पडतो, त्याचप्रमाणे भौतिक देहामध्ये बद्ध झाल्यावर मूळच्या शुद्ध, निर्मळ अशा जीवात्म्यामध्ये विकृती निर्माण होऊन त्याच्यात मैथुनाच्या रूपात शरीरसुख घेण्याची इच्छा निर्माण होते. मायाशक्तीच्या प्रभावामुळे आपण भौतिक शरीराशी तादात्म्य करू लागल्याने आपल्या अंत:करणातील भगवंतांप्रती असलेल्या प्रेमाचे रूपांतर जड भौतिक पदार्थांवरील आसक्तीमध्ये होते. या आसक्तीमुळेच बद्ध जीवात्मा मैथुनजीवनाकडे तसेच इतर इंद्रियतृप्तीकडे आकृष्ट होतो.

श्रीमद्भागवतात (७.९.४५) या मैथुनसुखाविषयी सांगितले आहे – ''मैथुनातून प्राप्त होणारे सुख हे अत्यंत तुच्छ आहे. खाज खाजविल्याप्रमाणे ही इच्छा आहे. कितीही खाजविले तरी खाज काही मिटत नाही, उलट ती वाढतच राहते आणि अधिक खाजविल्याने शेवटी शरीरातून रक्त निघू लागते. अगदी त्याचप्रमाणे, मैथुनसुख कितीही घेतले

तरी मनुष्य संतुष्ट होत नाही आणि अंतत: त्याला अनेकप्रकारच्या वेदनांना सामोरे जावे लागते. म्हणून बुद्धिमान मनुष्याने या मैथुनावर आवर घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'' या श्लोकावर आधारित मैथुनसुखाबाबत आपण तीन निष्कर्ष काढू शकतो – मैथुनसुख हे क्षणिक, भ्रामक आणि दु:खदायक आहे. ते कसे काय, हे थोडक्या पाहू –

भ्रामक : गाडी आणि चालकाच्या गरजा निराळ्या असतात त्याप्रमाणे शरीर आणि आत्म्याच्या गरजा निराळ्या आहेत. गाडीत पेट्रोल भरल्याने चालकाची भूक भागत नाही. त्याप्रमाणे, भौतिक इंद्रियतृप्तीद्वारे कधीच आत्मिक समाधान प्राप्त होत नाही.

मग, मैथुनसुख इतके हवेहवेसे का वाटते? याच्या उत्तरादाखल भागवत सांगते की,

प्रसारमाध्यमातून मैथुनसुखाचा भरपूर गवगवा केला जात असला तरी वास्तविकरीत्या त्यातून प्राप्त होणारे सुख अत्यंत क्षुल्लक आणि क्षणभंगुर असते.

क्षणभंगुर : प्रसारमाध्यमातून मैथुनसुखाचा भरपूर गवगवा केला जात असला तरी वास्तविकरीत्या त्यातून प्राप्त होणारे सुख अत्यंत क्षुल्लक आणि क्षणभंगुर असते. भौतिक शरीराद्वारे भोग घेण्याला नेहमीच मर्यादा असते. येथे आपण स्पंजाचे उदाहरण पाहू शकतो. स्पंज पाण्यात बुडवून काढल्यास त्याला अगदी थोडा जरी स्पर्श केला तर त्यातून पाणी पडू लागते. नंतर जसजसा स्पंज अधिकाधिक पिळला जातो, तसतसे त्यातून अगदी थोडे थोडे पाणी पडू लागते आणि सरतेशेवटी कितीही स्पंज पिळला तरी त्यातून एक थेंबभर पाणीदेखील बाहेर पडत नाही. अंतत: स्पंज पिळण्याचा व्यर्थ प्रयत्नच बाकी राहतो. मैथुनक्रियेतून मिळणारे सुख देखील असेच आहे. सुरुवातीला मैथुन सुखकारक वाटतो खरा; परंतु, सततच्या मैथुनामुळे त्यातून प्राप्त होणारे सुख कमी कमी होत जाते.

जसजसे वय वाढत जाते तसतसे मैथुन करण्याची क्षमता आणि शक्ती देखील घटत जाते. युवावस्थेत सहजरीत्या मैथुनाद्वारे सुख प्राप्त करता येते; परंतु, वयोमान वाढते तसे हे सुख कमी होत जाते आणि अंतत: वृद्धावस्थेत मैथुनातून मुळीच सुख प्राप्त करता येत नाही.

अशा प्रकारे मैथुनसुख हे क्षणभंगुर असल्याने भागवतात त्याला तुच्छ सुख मानले गेले आहे. सुरुवातीला खाजविताना थोडेफार बरे वाटते; परंतु ते क्षणिक सुख असते. यामुळे व्यक्ती अधिकाधिक खाजवू लागतो आणि शेवटी तो खाजविणे थांबवू शकत नाही आणि त्याची परिणिती त्वचेतून रक्त येण्यामध्ये होते. त्याचप्रमाणे मैथुनसुख देखील अगदी क्षणिक आहे आणि कितीही वेळा मैथुन केले तरी त्यातून चिरकाळ टिकणारे सुख प्राप्त होऊ शकत नाही.

दु:खदायक : अधिकाधिक खाजविल्याने त्वचेतून रक्त येते त्याप्रमाणे वारंवार मैथुन केल्याने सुखाऐवजी शेवटी दु:खच वाट्याला येते. मैथुनामुळे आपली शरीराशी आसक्ती वाढत जाते आणि त्याचा परिणाम म्हणून आपल्याला पुन्हा पुन्हा या भौतिक जगात जन्म घ्यायला लागून विविध योनींमध्ये अनंत प्रकारची दु:खे सहन करावी लागतात. अशा प्रकारे देहात्मबुद्धीत पडल्यावर वारंवार जन्म, मृत्यू, जरा, व्याधीचे दु:ख आपल्या वाट्याला येते.

मैथुन, विशेषत: अनैतिक मैथुनसंबंधामुळे गर्भपात, वैवाहिक संबंध संपुष्टात येणे अशा अनेक समस्या आजच्या समाजाला भेडसावत आहेत. तसेच, अशा व्यभिचारामुळे एडस् सारख्या भयानक रोगाने मानव समाजाच्या अस्तित्वालाच धोक्यात आणले आहे.

इतकेच नव्हे, तर मैथुनाला आसक्त असणाऱ्या व्यक्तीकडे आध्यात्मिक ज्ञानाचा अभाव असल्याने अनेकदा असे लोक एकटेपणा, असंतुष्टीचा अनुभव करतात. इंद्रियतृप्तीद्वारे सुख प्राप्त होते, अशा खोट्या आशेमुळेच जीवात्मा ते प्राप्त करण्यासाठी जीवनभर खडतर प्रयत्न करीत राहतो.

केवळ प्रजजनासाठीच

वैदिक संस्कृती ही जीवात्म्याला या भौतिक जंजाळातून मुक्त करण्यासाठीच आहे. वैदिक समाज पद्धती ही मानव योनीतील प्रत्येक जीवात्म्याला त्याची मूळ स्वरूप स्थिती प्राप्त करण्यास मदत करते. त्यामुळे वेदांमध्ये इतर लौकिक विद्यांपेक्षाही आत्म्याच्या स्वभाविक स्वरूपाच्या माहितीवर अधिक भर देण्यात आला आहे. अशा आत्मज्ञानामुळे वेदांचे अध्ययन करणारा विद्यार्थी मैथुनसुखाच्या मायावी पाशातून स्वत:ला वाचवू शकतो.

मैथुन ही बद्ध जीवात्म्यासाठी एक शारीरिक आवेग असून त्याची स्वाभाविक परिणिती ही प्रजजनामध्ये होते. वैदिक विज्ञान हे आजच्या जड विज्ञानापेक्षा अधिक सूक्ष्म असल्याने ते सांगते स्त्री-पुरुषा एकत्र येतात तेव्हा त्यांची जी चेतना असते त्यानुसार एका विशिष्ट जीवात्म्याला पुरुषाच्या वीर्यातून स्त्रीच्या गर्भात सोडले जाते. या वस्तुस्थितीची जाणीव असलेले विवाहित जोडपे समाज आणि भगवंतांची सेवा म्हणून पुत्रप्राप्तीसाठी एकत्र येतात. त्यांच्याद्वारे जन्मास येणारे बालक समाजामध्ये एक आदर्श व्यक्तीमत्त्व बनेल, याची संपूर्ण जबाबदारी ते उचलतात. अशा उदात्त कारणासाठी पती-पत्नीचे एकत्र येणे वेदांद्वारे गौरवशाली मानले गेले आहे. भगवद्गीतेत (७.११) स्वत: भगवान श्रीकृष्ण याला मान्यता देतात, *धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ* – ''हे भरतश्रेष्ठ अर्जुन! धर्मत्त्वांविरुद्ध नसणारा कामही मीच आहे.''

आजच्या काळात कामवासनेचा इतका हैदोस माजला असताना कदाचित हे अव्यावहार्य किंवा अगदी अस्वाभाविक देखील वाटेल. खरे

तर मैथुन हे प्रजनन करण्यासाठीच आहे. गर्भनिरोधकांचा वापर करून मानव प्राकृतिक नियमांच्या विरुद्ध जात आहेत. त्यांच्या मनात सतत कामुक विचार संचारित असल्याने शेवटी त्यांना आधी सांगितलेल्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणूनच वैदिक शास्त्रे सांगतात की निर्धोकपणे मैथुन केल्याने नव्हे, तर मैथुनावर नियंत्रण आणल्यानेच आपण वास्तविक स्वातंत्र्याचा अनुभव करू शकतो. मैथुनामुळे निर्माण होणाऱ्या समस्या पाहून काहीजण आजीवन ब्रह्मचर्य पालन करण्याचा निर्णय घेतात. परंतु, बहुतांशी लोक हा मार्ग स्वीकारणार नाहीत किंवा स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून मैथुनजीवनावर नियंत्रण करण्यासाठी वैदिक शास्त्रांमध्ये विवाहसंस्थेला महत्त्व दिले आहे.

विवाहसंस्था

जेव्हा वैदिक ज्ञान अवगत असलेले जोडपे विवाहबद्ध होतात तेव्हा आध्यात्मिक साधनेमुळे ते शारीरिक सुखातील व्यर्थता लगेचच समजतात. मग, त्यानंतर त्यांच्यासाठी जीवनाचा एक उद्देश राहतो – एकमेकांना भगवंतांकडे जाण्यास मदत करणे. या संदर्भात श्रील प्रभुपाद लिहितात – ''मानवी मनाला नियंत्रीत करण्यासाठी विवाह संस्कार सांगण्यात आला आहे, ज्यामुळे तो आध्यात्मिक प्रगतीवर आपले लक्ष्य केंद्रित करू शकेल.'' त्यामुळे वैदिक संस्कृतीमध्ये विवाहाचा उद्देश इंद्रियतृप्ती नसून अंत:करणाचे शुद्धिकरण हा आहे. त्यामुळे वैवाहिक जीवनामध्ये देखील मैथुनावर नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मैथुनावरील निर्बंध हा लोकांना सुखापासून वंचित करण्यासाठी नसून तो त्यांना आध्यात्मिक जगातील दिव्यानंदाच्या प्राप्तीसाठी पात्र बनविण्यासाठी आहे. हा आनंद प्राप्त करणे ही जीवात्म्याची स्वाभाविक स्थिती आहे. वैदिक ज्ञानानुसार भौतिक इंद्रियतृप्तीमुळे आत्मा जड शरीरात अडकतो, जेथे त्याला अगदी किंचित सुख प्राप्त होते. परंतु, अनंत आध्यात्मिक आनंद प्राप्त करणे ही जीवाची स्वाभाविक स्थिती आहे, जी केवळ या देहात्मबुद्धीतून बाहेर पडल्यावरच शक्य आहे आणि त्यासाठी मैथुनावर नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मैथुनावरील निर्बंध नव्हे तर स्वैराचारी मैथुनसंबंध जीवात्म्याला खऱ्या आध्यात्मिक सुखापासून वंचित करतो.

केवळ वैदिक शास्त्रेच नव्हे तर जगातील सर्व अधिकृत धर्मशास्त्रे इंद्रियतृप्तीपासून अलिप्तता किंवा वैराग्यकडे निर्देशित करतात. यामुळे आपण भौतिक जीवनाच्या जंजाळापासून स्वत:चे रक्षण करू शकतो आणि याद्वारे चेतनेची उन्नती करून आध्यात्मिक स्तरावर स्थित होऊ शकतो.

वैदिक संस्कृती तसेच जगातील इतर प्राचीन संस्कृतींचा उद्देश हाच होता की मनुष्याने आध्यात्मिक साधनेद्वारे त्याच्या हृदयातील सुप्त भगवद्प्रेम जागृत करावे आणि शाश्वत, दिव्य आनंदाची प्राप्ती करावी. परंतु, जसजसा काळ लोटत गेला तसतसे लोक आध्यात्मिक जीवनाकडे अधिकाधिक दुर्लक्ष करू लागले.

यामुळे प्राचीन संस्कृतींचा उद्देश झाकला गेल्याने लोक त्याला विसरून गेले. सर्वजण इंद्रियभोगाच्या मागे धावू लागले. यामुळे समाजामध्ये घटस्फोट, विवाहपूर्व संबंध अशा अनेक समस्या निर्माण झाल्या.

जीवात्म्याचा हा सुखाचा शोध तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा त्याला त्याचा भगवान श्रीकृष्णांशी असलेल्या मूळ संबंधाची जाणीव होईल. मैथुनसुख हे भगवद्प्राप्तीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या साधकाला मार्गभ्रष्ट करणारे आहे. जितके आपण मैथुनामध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करू तितके आपण भगवद्प्रेमरूपी दिव्यानंदापासून अधिकाधिक दूर जाऊ.

आपली निवड

परंतु, आपल्यासाठी एक आशा आहे. मैथुनामुळे निर्माण होणाऱ्या भौतिक तसेच आध्यात्मिक समस्यांविषयी जाणीव झाल्यास आपण वैदिक तत्त्वज्ञानाचा अवलंब करून आपला आध्यात्मिक पाया भक्कम करू शकतो. यामुळे आपले परमधन असणाऱ्या भगवान श्रीकृष्णांची पुन्हा प्राप्ती करू शकतो.

अनादीकाळापासून श्रीकृष्ण आपली वाट पाहात आहेत. आपल्या सुंदर बासरीवादनाद्वारे ते सर्वांना त्यांच्या परमधामात अनंत सुख प्राप्त करण्यासाठी बोलावित आहेत. या अंधकारमय अशा कलियुगात भगवंतांनी त्यांच्या नामकीर्तनाद्वारे त्यांना प्राप्त करण्याचा अगदी सोपा मार्ग आपल्यासाठी दिलेला आहे. विशेषत: *हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे / हरे राम हरे राम राम राम हरे हरे //* या महामंत्राच्या जप आणि कीर्तनाद्वारे आपण कलियुगाच्या प्रभावावर सहजरीत्या मात करून आपल्या हृदयातील सुप्त कृष्णप्रेम जागृत करू शकतो. भगवन्नामाच्या उच्चारणामुळे शुद्ध अंत:करणाद्वारे जेव्हा दिव्यानंदाचा अनुभव करू तेव्हा मैथुनापासून मिळणारे सुख आपणास अत्यंत तुच्छ आणि व्यर्थ वाटू लागेल. त्यामुळे, सध्या चाललेल्या अधोगतीमध्ये वहावत जाऊन अधिकाधिक पापमय जीवन जगावे की वैदिक संस्कृतीचे पालन करीत शाश्वत, दिव्य असा आनंद प्राप्त करावा – याची निवड आपणास करावयाची आहे.

मैथुनसुख हे भगवद्प्राप्तीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या साधकाला मार्गभ्रष्ट करणारे आहे. जितके आपण मैथुनामध्ये सुख शोधण्याचा प्रयत्न करू तितके आपण भगवद्प्रेमरूपी दिव्यानंदापासून अधिकाधिक दूर जाऊ.

(चैतन्यचरण दास हे अभियांत्रिकी शाखेत पदवीधर आहेत. ते पुणे इस्कॉन मंदिरात ब्रह्मचारी आहेत आणि तेथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कृष्णभावनेचा प्रचार करतात.)

माझा पुत्रच पथप्रदर्शक गुरु ठरला

जेव्हा माझा पुत्र हरे कृष्ण संस्थेत सामिल झाला, तेव्हा काय करावे हेच मला कळेना. परंतु, त्याविषयी अधिक माहिती मिळविण्याचा मी दृढनिश्चय केला.

– कृष्णकुमारी देवी दासी

वयाच्या १९व्या वर्षी माझा मुलगा पोर्टलँड (ओरेगॉन, अमेरिका) येथील त्याच्या मित्राबरोबर राहू लागलां. त्याला रॉक संगीतकार बनून अमाप पैसा आणि प्रसिद्धी कमवायची होती. बरोबर त्याचवेळी माझी मुलगी देखील तिच्या पहिल्या मुलासाठी गर्भवती होती. ती प्रसूत असताना सर्वजण उत्कंठीत होते; परंतु प्रसुतीसाठी बराच वेळ लागला आणि त्यात अनेक समस्या उद्‌भवल्या.

अशा तणावाच्या वातावरणात माझ्या पतीचा फोन आला आणि त्यांनी येथील परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर माझ्या मुलाविषयी विचारपूस केली. काही दिवसांपूर्वीच माझे त्याच्याबरोबर बोलणे झाले होते आणि तो काम करीत करीत कॉलेज शिकत असल्याचे माझ्या पतीला सांगितले. यावर त्यांनी एक नवीन धक्कादायक बातमी सांगितली की आता आमच्या मुलगा कॉलेज वगैरे सर्व सोडून हरे कृष्ण संस्थेत सामिल झाला आहे.

हे ऐकून मला आश्चर्याचा धक्कास बसला. माझ्या मनात हरे कृष्ण भक्तांविषयी एक निराळीच (आणि चुकीची) प्रतिमा होती. मला वाटायचे की हे हरे कृष्ण भक्त भगवी वस्त्रे परिधन करून रस्त्यातून कीर्तन करीत नृत्य करतात आणि विमानतळावर लोकांकडून पैसे मागतात. माझ्या पुत्राने देखील अशा प्रकारे जीवन व्यतीत करावे, अशी माझी बिलकूल इच्छा नव्हती. सध्या माझ्या मुलीच्या प्रसूतीबाबत थोडी समस्या निर्माण झाली असल्याने या गोष्टीवर नंतर विचार

करण्याचे ठरविले.

दोन आठवड्यानंतर मी आणि माझे पती आमचा मुलगा खरे काय करीत आहे, हे पाहण्यासाठी पोर्टलँड येथील इस्कॉन मंदिराला भेट दिली. तेथे पांढरा धोती-कुर्ता परिधान केलेल्या माझ्या पुत्राने आमचे स्वागत केले. त्याने डोक्याचे मुंडन केले होते आणि शिखाही ठेवली होती. त्याचे हे नवीन रूप पाहून आम्ही अवाक् झालो. त्याच्यामध्ये घडलेल्या अचानक बदलाबद्दल मी काही समजू शकले नाही; परंतु त्यामागचे कारण शोधून काढण्याचा मी निर्धार केला.

संध्याकाळच्या आरतीसाठी मंदिरात आलो असता तेथील हरे कृष्ण महामंत्राच्या कीर्तनाकडे माझे मन आकर्षित झाले. त्यानंतर भगवद्‌गीतेवर प्रवचन झाले. प्रवचनात काय सांगितले ते आता मला आठवत नाही; परंतु त्यातील एकही गोष्ट मला समजली नाही, हे मात्र खरे. त्या दिवशी मंदिराच्या अध्याक्षांनीच प्रवचन दिले होते. त्यांनी आमच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि अत्यंत गंभीरपणे आम्हाला आमच्या मुलाविषयी वाटणारी काळजी ऐकून घेतली. आमच्या मनातील शंका आणि भय दूर करण्याचा त्यांनी पुरेपूर प्रयत्न केला. मला भीती वाटत होती की, या संस्थेत सामिल झाल्यावर तो (माझा मुलगा) आमच्याशी असलेला संबंध तोडेल का? परंतु, पुढील दिवसात आलेल्या अनुभवांनुसार माझा तो गैरसमज असल्याचे मी जाणले.

त्यावेळी मंदिरात पहिल्यांदा मुलाला भेटले असता त्याच्यातील बदल अतिशय विचित्र वाटला होता. मला त्यावेळी समजले नाही की, कशामुळे माझ्या पुत्रामध्ये हा आमुलाग्र बदल घडून आला आहे. परंतु, आश्चर्यकारकदृष्ट्या त्याने अवलंबिलेली जीवनपद्धती मला काहीशी ओळखीची आणि आकर्षक वाटू लागली होती. एक आई या नात्याने माझी जबाबदारी पार पाडण्यात मी चुकले का, याचा मी खोलवर विचार करू लागले. त्यानंतर ज्या कृष्णभावनेकडे माझा पुत्र आकृष्ट झाला होता त्याचे तत्त्वज्ञान बारकाईने समजून घेण्याचा मी निर्धार केला. युवावस्थेत मी देखील परम सत्याच्या शोधात होते. कदाचित त्याचीच परिणिती म्हणून मी हा निर्णय घेतला होता.

माझा मृत्यूनजीक देहबाह्य अनुभव

आठ वर्षांची असताना मला मृत्यूनजीक अनुभव आला होता. जन्मावेळी माझ्यात अनेक दोष असल्याने भविष्यात माझ्यावर अनेक शस्त्रक्रिया करण्यात येणार होत्या. प्रत्येक शस्त्रक्रियेवेळी मी मरण्याचा धोका होता. एका शस्त्रक्रियेवेळी काही समस्या निर्माण झाल्या आणि माझे हृदयस्पंदन काही काळापुरते थांबले. त्यावेळी मी शरीरातून बाहेर आले आणि शस्त्रक्रिया चाललेल्या खोलीत एका कोपऱ्यातून मला वाचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या डॉक्टरांना पाहिले. शरीरातून बाहेर आल्यावर अगदी मुक्त झाल्यासारखे वाटले. मी शरीरापासून दूर जाऊ लागले तसे कोणत्यातरी अज्ञात शक्तीने मला थांबविले. मला पुन्हा शरीरात प्रवेश करण्याची मुळीच इच्छा नव्हती. परंतु, त्या अज्ञात शक्तीने सांगितले की 'त्याचे स्मरण' करण्यासाठी मला पुन्हा शरीरात प्रवेश करावा लागेल.

'त्याचे' म्हणजे नेमके मला कोणाचे स्मरण करावयाचे होते, हे मला समजेना. त्याचक्षणी मी पुन्हा शरीरात खेचले गेले. पुन्हा दु:ख आणि वेदनांची मला जाणीव होऊ लागली. अशा देहबाह्य अनुभवांना अनेक तज्ञ वैद्याची मान्यता आहे. माझ्याबाबत घडलेल्या या घटनेची माझ्या पालकांनी वैद्यांकडे नोंद केली. बेचाळीस वर्षांपूर्वी घडलेल्या या घडनेची स्मृती अजूनही माझ्या मनात ताजी आहे. त्यावेळपासून मी जाणले होते की माझे खरे अस्तित्व हे या शरीरापासून भिन्न आहे. त्यानंतरचे माझे आयुष्य माझ्या पुढील प्रवासाची तयारी ठरले.

कृष्णभावनेविषयी अधिक माहिती

मंदिरातील प्रथम अनुभवानंतर मी श्रील प्रभुपादांची पुस्तके वाचू लागले, पोर्टलँड मंदिरातील सत्संग कार्यक्रमांना उपस्थित राहू लागले आणि शक्य त्यावेळी सुट्टीच्या दिवशी मंदिरात सेवा करण्यासाठी राहू लागले. कृष्णभावनेचे तत्त्वज्ञान जसजसे समजू लागले तेव्हा स्वत:देखील भक्त बनण्याची इच्छा मनात जागृत होऊ लागली. मी अशा प्रकारे जीवन जगू लागले ज्यामुळे इस्कॉनमधील चार नियमांचे मी पालन करू शकेन – मांसाहार वर्ज्य, जुगार वर्ज्य, नशापान वर्ज्य, व्यभिचार वर्ज्य. याबरोबर मी हरे कृष्ण महामंत्राचा सोळा माळा जप देखील सुरू केला.

असेच एकदा रविवारी मंदिरात गेले असता तेथे बीर कृष्ण गोस्वामी यांच्याशी भेट झाली. ते संन्याशी होते. त्यांच्या प्रवचनांतून कृष्णभावनेविषयी मला आणखी बोध होऊ लागला. त्यांच्याबरोबरील चर्चांमध्ये मी माझ्या जीवनाविषयी आणि कृष्णभावनेतील पदार्पणाविषयी सांगितले. त्यांच्याकडे दीक्षेसाठी विनंती केली असता त्यांनी ती विनंती मान्य केली. त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे. त्यानंतर मी व्हॅन्कुवर इस्कॉन मंदिरात सेवा करू लागले. तेथून जवळच माझे घर होते. मंदिरातील भक्त अतिशय प्रेमळ होते. मंदिरातील भक्त म्हणजे जणू माझे आध्यात्मिक कुटूंबच बनले. त्यांच्या संगामुळेच मी आध्यात्मिक जीवनात प्रगती करू शकले.

माझ्या पुत्राची देखील दीक्षा झाली आहे. त्याला 'त्रिकालज्ञ' हे आध्यात्मिक नाव मिळाले आहे. भक्तीत आल्यापासून आमचे संबंध केवळ औपचारिक न राहता दिवसेंदिवस अधिक प्रेमळ बनले आहेत. आमच्या कुटूंबातील इतर सदस्य देखील भक्त झाले आहेत आणि पूर्णत: भक्त न बनलेले इतर सदस्य इस्कॉनच्या कार्यक्रमांना सढळ हस्ते मदत करतात. इस्कॉनमध्ये मला एक नवीन जीवन मिळाले आहे, ज्यामुळे जेथे कुठेही जाईन तेथे मला भगवान श्रीकृष्णांविषयी श्रवण करण्यास मिळते.

मला भक्त बनण्याची जी संधी मिळाली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडतील. आता मला माझ्या मृत्यूनजीकच्या अनुभवाचा अर्थ समजला आहे. मला आता 'त्याचे' म्हणजे 'भगवान श्रीकृष्णांचे' स्मरण करावयाचे होते. श्रीकृष्णांप्रती प्रेम जागृत करणे, हेच माझ्या सद्य आणि पुढील आयुष्यांचे उद्दिष्ट असेल. मी प्रार्थना करते की, जन्मजन्मांतर मी त्यांच्या चरणकमळांवर एका धुलिकणाच्या रूपात स्थित होईन.

सर्वश्रेष्ठ वरदान

श्रीकृष्णांचे नामच जीवात्म्यासाठी परमधन आहे.

– मोहिनीराधा देवी दासी

काही लोक अमाप संपत्ती जमविण्याची आणि त्यातून हवी ती वस्तू विकत घेण्याची स्वप्ने पहात असतात. त्यांना वाटते चांगले घर, चांगली गाडी, सुंदर वस्त्रालंकार इत्यादी गोष्टी प्राप्त करणे म्हणजेच सुख आहे.

आणि, आपल्यासारखे असेही लोक असतात, जे म्हणतात – ''पैशाद्वारे कधीच सुख प्राप्त करता येत नाही.'' परंतु, आपला यावर खरोखरच विश्वास आहे का? पैसे नाहीत तर आपल्या अंत:करणातील इच्छांवर कोणते समाधान आहे? असे ते कोणते परमधन आहे, ज्याद्वारे आपण खऱ्या सुखाची प्राप्ती करू शकतो? आणि, ते परमधन कसे प्राप्त करता येईल?

श्रील प्रभुपाद या प्रश्नांची उत्तरे आपल्या एका तात्पर्यात वर्णन करतात. त्यामध्ये एका भाग्यशाली ब्राह्मणाची कथा सांगितली आहे ज्याला भगवान शिवांकडून वरदान प्राप्त झाले होते. (श्रीमद्भागवत, श्लोक – ४.७.६, तात्पर्य) या कथेतून आपणास समजून येईल की खरे परमधन हे भौतिक नसून आध्यात्मिक आहे.

एकदा एक गरिब ब्राह्मण वरदान प्राप्त करण्यासाठी भगवान शिवांची पूजा करू लागला. भगवान शिव हे *मिढुस्तमा* अर्थात 'वरदान देणाऱ्यांमध्ये सर्वश्रेष्ठ' म्हणून ओळखले जातात. यामुळे अनेक भौतिकवादी लोक आपल्या इच्छापूर्तीसाठी शिवांची पूजा करतात. परंतु, या ब्राह्मणाच्या आध्यात्मिक जीवनासाठी शिवांनी त्यांच्याकडील सर्वश्रेष्ठ वरदान अर्पण केले. त्यांनी ब्राह्मणाला श्रीचैतन्य महाप्रभूंचे शिष्य असणाऱ्या सनातन गोस्वामींकडे जाण्यास सांगितले, ज्यांच्याकडून त्याला सर्वश्रेष्ठ वरदान प्राप्त होणार होते.

ब्राह्मण सनातन गोस्वामींकडे आला असता त्याने पाहिले की सनातन गोस्वामींनी त्यांच्याकडील पारसमणी कचराकुंडीत टाकला आहे. या पारसमण्याचा लोखंडाला स्पर्श करताच त्याचे सोन्यामध्ये रूपांतर करता येते. ब्राह्मणाने विनंती केल्यावर सनातन गोस्वामींनी तो पारसमणी ब्राह्मणाला देऊन टाकला. आता आपण सर्वात धनवान बनणार, असा विचार करीत ब्राह्मण पारसमणी घेऊन जाऊ लागला.

सनातन गोस्वामींच्या भजनस्थळी पासून काही अंतरच दूर गेल्यावर त्याच्या मनात एक शंकेची पाल चुकचुकली, ''हा पारसमणीच सर्वश्रेष्ठ वरदान असते तर सनातन गोस्वामींनी त्याला एखाद्या व्यर्थ वस्तूप्रमाणे कचऱ्याच्या डब्ब्यात का टाकले होते? याचा अर्थ, नक्कीच

BACARDI

सनातन गोस्वामींकडे यापेक्षाही अधिक मौल्यवान वस्तू असणार.''

ब्राह्मण पुन्हा सनातन गोस्वामींकडे येऊन म्हणाला, ''महाशय, हा पारसमणी म्हणजेच आपले श्रेष्ठ वरदान होते, तर त्याला आपण कचराकुंडीत का टाकले होते?''

सनातन गोस्वामींनी उत्तर दिले की हा पारसमणी म्हणजे त्यांच्याकडील सर्वश्रेष्ठ वरदान नव्हते.

जेव्हा ब्राह्मण याविषयी अधिक अतुरतेने विचारपूस करू लागला तेव्हा सनातन गोस्वामींनी त्याला पारसमणी यमुनेच्या पाण्यात टाकण्यास सांगितले.

पारसमणी यमुनेत टाकून परतल्यावर सनातन गोस्वामींनी ब्राह्मणाला दीक्षा देऊन त्याला *हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे / हरे राम हरे राम राम राम हरे हरे //* हा महामंत्र प्रदान केला. अशा प्रकारे भगवान शिवांच्या कृपेने ब्राह्मणाला सर्वश्रेष्ठ वरदान प्राप्त झाले – एका शुद्ध भक्ताच्या संगतीत हरे कृष्ण महामंत्राचा जप करण्याचे.

भौतिकवादी इच्छांचा त्याग

पारसमणी भौतिक इच्छांचे प्रतिक आहे. जेव्हा आपण स्वत:च्या इंद्रियतृप्तीकरीता संपत्ती जमा करतो, तेव्हा आपल्या आध्यात्मिक प्रगतीत बाधा निर्माण होते. आपण स्वत:ला त्या संपत्तीचा उपभोक्ता समजू लागतो. अशा प्रकारे भौतिक संपत्तीला आसक्त झाल्याने आपण हे विसरतो की सर्वकाही भगवान श्रीकृष्णांकडूनच प्राप्त होते आणि त्यामुळे ते त्यांच्याच सेवेप्रित्यर्थ वापरले जावे. येशू ख्रिस्त सांगतात की, एखाद्या उन्मत्त धनवान व्यक्तीला भगवद्धामात प्रवेश मिळण्यापेक्षा एका उंटाला सुईच्या छिद्रातून ओवणे सोपे आहे. श्रील प्रभुपाद सांगतात त्याप्रमाणे, ''भौतिक इच्छा आणि आध्यात्मिक जीवनातील प्रगती कधीच एकत्र जाऊ शकत नाहीत.''

सनातन गोस्वामींचा पारसमणी फेकून देण्याचा आदेश हा भौतिकवादी इच्छांचा त्याग करण्याकडे निर्देशित करतो. आपल्याला आध्यात्मिक जीवनरूपी सर्वश्रेष्ठ वरदान हवे असेल तर आपण भौतिक इंद्रियतृप्तीचा त्याग केलाच पाहिजे. असे न करणे म्हणजे नांगर टाकलेली नौका वल्हवण्यासारखे आहे. कितीही प्रयत्न केला तरी आपण थोडेदेखील अंतर पार करू शकणार नाही. त्यामुळे आध्यात्मिक जीवनात प्रगती करावयाची असेल तर आपण हा भौतिक इच्छांरूपी नांगर काढला पाहिजे.

भगवन्नामाचा आश्रय घेऊन आपण सहजरीत्या श्रीकृष्णांना प्राप्त करू शकतो. या भगवन्नामांमध्ये भगवंतांच्या सर्व शक्ती अंतर्भूत आहेत.

ब्रह्म-मध्व-गौडिय गुरुशिष्य परंपरेतील एक महान आचार्य, श्रील भक्तिविनोद ठाकूर सांगतात की, भगवंतांचे पवित्र नाम हाच खरा पारसमणी आहे. (पारसमण्याला संस्कृत भाषेत *चिंतामणि* म्हटले जाते.) अशा या भगवन्नामरूपी पारसमण्याच्या संपर्कात येताच आपल्याला कृष्णप्रेमरूपी परमधन प्राप्त होऊ शकते. कृष्णप्रेमाची प्राप्ती हेच मनुष्य जीवनाचे अंतिम लक्ष्य आहे.

ब्राह्मणाने जेव्हा त्या भौतिक पारमण्याचा त्याग करून आध्यात्मिक पारसमण्याचा स्वीकार केला तेव्हा त्याला सर्वश्रेष्ठ वरदान प्राप्त झाले – महान भक्तांच्या मार्गदर्शनाखाली भगवान श्रीकृष्णांच्या चरणी अनन्य भक्तिमय सेवा.

परिपूर्ण भगवन्नाम

भगवंत हे परिपूर्ण असल्याने त्यांचे नाम, रूप, गुण, लीला, परिकर यांच्यापासून ते अभिन्न आहेत. याचा अर्थ भगवंतांची सूर्याप्रमाणे प्रकाशमय असणारी गुणवैशिष्ठ्ये त्यांच्या पवित्र नामांमध्ये देखील अंतर्भूत आहेत. भौतिक इच्छांरूपी ढगांनी आपले अंत:करण झाकले गेल्याने बद्धावस्थेत आपण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकत नाही.

पवित्र भगवन्नामरूपी सूर्याचे दर्शन होऊन केव्हा भगवंतांचे नित्य सेवक म्हणून आपल्या मूळ स्वाभाविक स्थितीचा साक्षात्कार होऊ शकतो? यासाठी भगवान श्रीकृष्ण त्यांना पूर्णपणे शरणागत येण्यास सांगतात आणि ते स्वत: श्रीचैतन्य महाप्रभूंच्या रूपात सर्वश्रेष्ठ शरणागतीचे उदाहरण प्रस्तुत करतात. यावेळी ते आत्मसाक्षात्काराचा प्रभावशाली मार्ग म्हणून हरिनामाचा, विशेषत: हरे कृष्ण महामंत्राचा – *हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे / हरे राम हरे राम राम राम हरे हरे //* प्रचार करतात. या संकीर्तन आंदोलनाचा प्रचार करण्यासाठीच श्रीचैतन्य महाप्रभू या जगात अवतरले. श्रीचैतन्य महाप्रभूंनुसार 'संकीर्तन' हेच कलियुगातील लोकांसाठी सर्वश्रेष्ठ वरदान आहे आणि याच हरिनाम संकीर्तनाद्वारे कोणत्याही पात्रतेचा विचार न करता त्यांना सर्वांना कृष्णप्रेमाचे मुक्तहस्ते वितरण केले. म्हणूनच रूप गोस्वामींनी (सनातन गोस्वामींचे बंधू) त्यांचा *महावदन्याय* अर्थात, 'सर्वात उदार अवतार' म्हणून गौरव केला आहे.

भगवन्नामाचा आश्रय घेऊन आपण सहजरीत्या श्रीकृष्णांना प्राप्त करू शकतो. या भगवन्नामांमध्ये भगवंतांच्या सर्व शक्ती अंतर्भूत आहेत. पवित्र भगवन्नाम हे सामान्य, भौतिक नाम नसून ते श्रीकृष्णांहून अभिन्न आहे. भगवद्गीतेत (१०.२५) ते स्वत: याची पुष्टी देतात, *यज्ञानां जपयज्ञोऽस्मि* – ''यज्ञांमध्ये जपयज्ञ मी आहे.'' खरेतर, हा जपयज्ञ इतका महत्त्वपूर्ण आहे की वैदिक शास्त्रांमध्ये त्याला कलियुगातील सर्व कल्मषांतून मुक्त करणारा 'युगधर्म' म्हणून घोषित करण्यात आले.

कलियुगातील हे दोषपूर्ण असल्याने त्यातील लोक मंद बुद्धी आहेत, त्यांचे आयुष्यमान फारच छोटे आहे, त्यांची स्मरणशक्ती कमी आहे, त्यांचे शारीरिक सामर्थ्य देखील क्षीण आहे. अशा सर्व दोषांमुळे एखाद्याला आध्यात्मिक साक्षात्कार प्राप्त करणे अतिशय कठीण आहे. परंतु, या कलियुगात एक महान गुण आहे, तो म्हणजे – केवळ भगवंतांच्या पवित्र नामांचा जप केल्याने व्यक्ती शुद्ध कृष्णप्रेमाची प्राप्ती करू शकतो. म्हणून ब्रह्मन्–नारदीय पुराणात (३.८.१२६) सांगण्यात आले आहे –

हर्रेनाम हर्रेनाम हर्रेनामैव केवलम् ।
कलौ नास्तैव नास्तैव नास्तैव गतिर् अन्यथा ।।

''कलह आणि दंभयुक्त अशा कलियुगात आत्मसाक्षात्कारासाठी हरिनामाशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही, दुसरा कोणताही मार्ग नाही, दुसरा कोणताही मार्ग नाही.'' या श्लोकातून आपण पाहू शकतो की कलियुगातून तरून जाण्यासाठी केवळ आणि केवळ हरिनामावरच भर देण्यात आला आहे. ज्ञान, कर्म इत्यादी इतर आध्यात्मिक मार्ग कदाचित आपणास भक्तिमय सेवेपासून परावृत्त करू शकतात; परंतु हरे कृष्ण महामंत्राचा जप, कीर्तन आपल्याला त्वरित परमलक्ष्याची प्राप्ती करून देते. या हरिनाम संकीर्तनाद्वारे कलियुगातील सर्व अडथळ्यांना सहजरीत्या पार करून आपण पुन्हा भगवद्धामाची प्राप्ती करू शकतो.

दिव्य गुणांनी युक्त असलेले हरिनाम

पवित्र भगवन्नामांप्रती आसक्ती निर्माण होण्यासाठी वेदशास्त्रांमध्ये अनेकठिकाणी भगवन्नामाच्या गौरवाविषयी वर्णन करण्यात आले आहे. पद्मपुराणात सांगितले आहे –

भगवान श्रीकृष्णांचे पवित्र नाम हे दिव्यानंदाने पूर्ण आहे. ते श्रीकृष्णांपासून अभिन्न असल्याने सर्व आध्यात्मिक वरदान प्रदान करणारे आहे. त्यांने नाम परिपूर्ण असून सर्व दिव्य रसांनी युक्त आहे. श्रीकृष्णांचे नाम भौतिक नसून ते त्यांच्याइतकेच सामर्थ्यशाली आहे. भौतिक प्रकृतीच्या गुणांद्वारे ते प्रभावित होत नसल्याने ते कधीच मायेच्या अधीन येत नाही. श्रीकृष्णांचे नाम हे नित्यमुक्त असून पूर्णपणे आध्यात्मिक आहे. ते प्रकृतीच्या नियमांद्वारे कधीच बाध्य नाही, कारण ते स्वत: भगवान श्रीकृष्णांपासून अभिन्न आहे. (संदर्भ : चैतन्यचरितामृत, मध्य – १७.१३३)

भगवान श्रीकृष्णांमध्ये जे काही आहे ते सर्व त्यांच्या पवित्र नामामध्येही आहे. श्रील भक्तिविनोद ठाकूर आपल्या हरिनाम चिंतामणी पुस्तकात चैतन्यलीलेचा संदर्भ देतात, जेथे श्रील हरिदास ठाकूर श्रीचैतन्य महाप्रभूंना सांगतात की भगवंतांच्या नामात संपूर्ण आध्यात्मिक सृष्टी समाविष्ट असल्याने ते श्रीकृष्णरूपी खजिन्यातील सर्वश्रेष्ठ धन आहे.''

भौतिक जगातील नावे ही केवळ एकमेकांना संबोधण्यासाठी उच्चारलेले ध्वनी आहेत. श्रील प्रभुपाद सांगतात, ''भौतिक जगात केवळ 'आंबा, आंबा, आंबा' म्हटल्याने आंब्याची चव चाखता येत नाही.'' परंतु, श्रीकृष्ण आणि त्यांचे पवित्र नाम हे परस्परांहून अभिन्न आणि सर्वप्रकारे श्रेष्ठ आहे. श्रीकृष्णांच्या नामाबाबत आपला भौतिक युक्तिवाद लावून ते नाम श्रीकृष्णांहून भिन्न असल्याचा विचार केला, तर ती आपली मोठी घोडचूक ठरेल. जोपर्यंत भगवंतांच्या पवित्र नामाला सामान्य भौतिक नाम असल्याचे समजू तोपर्यंत आपल्याला कृष्णप्रेम प्राप्त करता येणार नाही. परंतु, अपराधशुन्य भावनेत भगवंतांचे नाम उच्चारल्यास भगवंत आपल्या सर्व दिव्य गुणांसह जिह्वेवर प्रकट होऊन नृत्य करू लागतील.

आपले अंत:करण अनर्थांनी भरले असल्याने आपणास श्रीकृष्णांच्या नामामधील त्यांची उपस्थिती अनुभवता येत नाही. जन्मजन्मांतरांपासून आपण अनेक निरनिराळी शरीरे धारण करून इंद्रियतृप्तीच्या मागे धावत आलो आहोत. परंतु, कितीही केले तरी या इंद्रियतृप्तीतून आपल्याला कधीच खरे समाधान प्राप्त झाले नाही. आपल्या देहात्मबुद्धीमुळे धुळीने आरसा झाकला जावा त्याप्रमाणे आपली मूळ स्वरूपस्थिती झाकली गेली आहे. श्रीकृष्णांच्या पवित्र नाम इतके शुद्ध आणि सामर्थ्यशाली आहे की त्याचा उच्चार करताच कोटयवधी जन्मांपासून आपल्या अंत:करणावर जमा झालेली अज्ञानरूपी धूळ त्वरित निघून जाते आणि आपणास आपल्या मूळ आध्यात्मिक स्वरूपाची प्रचिती येते. यावेळी आपण भौतिक इच्छा सोडून केवळ भगवान श्रीकृष्णांना प्रसन्न करण्याची इच्छा हृदयी बाळगून केवळ त्यांच्या संतुष्टीसाठीच कार्य करू लागतो.

श्रीकृष्णांच्या नामाबाबत आपला भौतिक युक्तिवाद लावून ते नाम श्रीकृष्णांहून भिन्न असल्याचा विचार केला, तर ती आपली मोठी घोडचूक ठरेल.

हे परिवर्तन केवळ आपल्या भवरोगावरील एकमेव औषध असलेल्या कृष्णनामाच्या कृपेमुळे शक्य आहे. यासंदर्भात श्रील रूप गोस्वामी एक कावीळ झालेल्या रुग्णाचा दृष्टांत देतात. कावीळ झालेला रुग्णाला अगदी साखरेसारखी गोड वस्तू देखील कडू लागते. परंतु, विशेष म्हणजे या काविळीवरील उपाय म्हणजे उसाचा रस. सुरुवातीला उसाचा मधुर रस त्या रुग्णाला कडू वाटतो खरा; परंतु जसजसे तो त्याचे अधिकाधिक सेवन करतो तसतसा त्याचा रोग उतरत गेल्याने तो उसाच्या रसाची खरी गोडी पुन्हा चाखू शकतो. उसाचा रस हा नेहमीच मधुर असतो; परंतु कावीळ

झालेल्या रुग्णाला तो कडू लागतो. त्याचप्रमाणे, श्रीकृष्णांचे पवित्र नाम हे सर्वात मधुर आहे; परंतु, आपली चेतना भौतिकवादाच्या रोगाने ग्रस्त झाल्याने आपण नामाची गोडी चाखू शकत नाही. मात्र, या पवित्र नामाचा पुन्हा पुन्हा उच्चार केल्यास आपला भवरोग हळूहळू नष्ट होत जाऊन शेवटी आपणास श्रीकृष्णनामाच्या खऱ्या मधुरतेचे रसास्वादन करता येते. जेव्हा आपण शुद्ध भावनेत हरिनामाचा जप करू लागू, तेव्हा तर आपण प्रत्येक क्षणाला नामाच्या सर्वोच्च मधुरतेचे पान करू शकतो.

भक्ताची कृपा

भगवान श्रीचैतन्य महाप्रभू आणि त्यांच्या अनुयायांच्या कृपेमुळे आपणास भगवन्नामाच्या रूपात सर्वात मधुर वस्तू प्राप्त झाली आहे. वैष्णव स्वत: शुद्ध अंत:करणाने हरिनामाचा जप तर करतोच, त्याबरोबर हे हरिनाम तो इतरांना देखील वितरित करतो. प्रह्लाद महाराजांचे उदाहरण घ्यावयाचे झाले तर, त्यांना स्वत:च्या मुक्तीपेक्षा या जगात खितपत पडलेल्या बद्ध जीवात्म्यांच्या मुक्तीची अधिक काळजी होती. यास्तवच श्रील प्रभुपाद सांगतात की, कृष्णभावनेचा प्रचार हेच सर्वश्रेष्ठ समाजिक कार्य आहे. श्रीकृष्ण तर दयेचे सागर आहेतच; परंतु, त्यांचा भक्त हा त्यांच्याहून अधिक कृपाळू असतो, कारण तो श्रीकृष्ण (आणि त्यांचे पवित्र नाम) सर्वांना वितरित करतो.

अशा प्रकारे अत्यंत कृतज्ञभावनेने आपण या कृपेचा स्वीकार करीत श्रीकृष्णनामांचा अत्यंत गंभीरपणे जप, कीर्तन केले पाहिजे. सनातन गोस्वामींनी ब्राह्मण विचारला होता, तोच प्रश्न आपण स्वत:ला विचारावा – आपण सर्वश्रेष्ठ वरदान प्राप्त करण्यासाठी तयार आहोत का? कमीत कमी बौद्धिक पातळीवर आपण हरे कृष्ण महामंत्राला सर्वश्रेष्ठ मानीत असू, तर आपण त्याचा अत्यंत गंभीरपणे स्वीकार केला पाहिजे. एखाद्याने आपल्याला सोन्या-हिऱ्यापासून बनविलेले दागिने दिले तर आपण किती काळजीपूर्वक त्यांचा सांभाळ करतो. ते चोरीला जाऊ नयेत याविषयी नेहमी सतर्क असतो. परंतु, या तर भौतिक जगातील जड वस्तू आहेत. श्रीकृष्णांचे नाम मात्र शुद्ध, शाश्वत आणि अमर्यादित आनंद प्रदान करणारे आहे. हे नाम म्हणजे आपल्या गुरूंकडून प्राप्त झालेली अमूल्य भेटवस्तू आहे, ज्याद्वारे आपण भगवंतांशी विस्मृत झालेला संबंध पुन्हा प्रस्थापित करू शकतो. सर्वात अमूल्य वस्तू म्हणून म्हणून या हरिनामाचा स्वीकार करून हरिनामाप्रती होणाऱ्या अपराधांपासून स्वत:ला वाचवावे.

जत्रेत हरविलेले बालक ज्या असहाय्य भावनेत तळमळीने आईला हाक मारीत असते, त्या भावात आपण हरिनामाचा जप केला पाहिजे.

आपण अत्यंत ध्यानपूर्वक हरिनामाचा जप केला पाहिजे. श्रील प्रभुपाद सांगतात की आपण हरे कृष्ण महामंत्रातील प्रत्येक नामाच्या ध्वनीचे ध्यानपूर्वक श्रवण करावे. जत्रेत हरविलेले बालक ज्या असहाय्य भावनेत तळमळीने आईला हाक मारीत असते, त्या भावात आपण हरिनामाचा जप केला पाहिजे. आपण देखील या भौतिक जगरूपी जत्रेत हरविले आहोत. म्हणून आपण अत्यंत तळमळीने हरिनामाचा जप करीत भगवान श्रीकृष्ण आणि त्यांची ह्लादिनी शक्ती असणाऱ्या श्रीमती राधाराणीचा आश्रय घेतला पाहिजे.

श्रील प्रभुपाद सांगतात की, ''भगवंतांनी आपला स्वीकार करावा, यासाठी आपण सतत प्रार्थनेच्या भावात रडले पाहिजे.'' श्रीचैतन्य महाप्रभूंनी हा असाह्य भाव आपल्या शिक्षाष्टक प्रार्थनेत व्यक्त केला आहे – ''हे कृष्ण! हे नंदसूत! माझे या अंधकारमय भौतिक जगात पतन झाले आहे. कृपया मला उचलून आपल्या चरणकमळांवरील धूलीकणाच्या रूपात स्थापित करा.''

भौतिकवादाचे विष

आपण श्रवण, कीर्तनासारख्या अगदी साध्या, सोप्या भक्तीक्रियेचा स्वीकार केला नाही तर आपण मृत व्यक्तीप्रमाणे आहोत. असे करणे म्हणजे जाणतेपणे विष प्राशन करण्याप्रमाणे आहे. श्रील नरोत्तम दास ठाकूर आपल्या एका भजनात म्हणतात, ''हे भगवंता! मी माझे जीवन व्यर्थ वस्तूंमागे धावण्यात घालविले आहे. हा दुर्लभ मानव देह प्राप्त होऊन देखील मी श्री श्री राधा-कृष्णांची भक्ती केली नाही. अशा प्रकारे मी जाणतेपणे विष प्राशन केले आहे.''

मनुष्य देह हा पशूंप्रमाणे केवळ आहार, निद्रा, भय, मैथुन करण्यासाठी नसून आध्यात्मिक साक्षात्कार प्राप्त करण्यासाठी आहे. आपल्याला प्राप्त झालेली प्रगत चेतना ही पशुवत जीवन जगण्यासाठी नसून भक्तिमय सेवेद्वारे भगवंतांना प्रसन्न करण्यासाठी आहे. असे केल्यास आपली जन्म, मृत्यू, जरा, व्याधीच्या दुस्तर चक्रातून सहजरीत्या मुक्तता होऊन आपण आपल्या शाश्वत निवासस्थानी, भगवद्धामात प्रवेश करू शकू. यामुळे मनुष्य देहात प्राप्त असलेली ही दुर्मिळ संधी आपण धुडकावून न लावता गंभीरपणे श्रीकृष्णांविषयी श्रवण, कीर्तन करून जीवनाचे परम लक्ष्य प्राप्त करावे.

हरिनाम संकीर्तन हे सर्वश्रेष्ठ धन आहे आणि आपण त्याचा स्वीकार केला नाही तर आपल्यासारखे दुर्भाग्यशाली इतर कोणीही नसणार. नरोत्तम दास ठाकूर आपल्या भजनात म्हणतात, ''हरिनाम संकीर्तन हे गोलोक

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाची महाराष्ट्रातील केंद्रे

संस्थापकाचार्य : कृष्णकृपाश्रीमूर्ती ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद

- **अमरावती** : श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश मंदिर, सरस्वती कॉलनी, राठी नगर, अमरावती.दूरध्वनी :(०२७१) २६६६८४९, ९४२३१२७८४५
- **आरवडे**:- श्री श्री राधा-गोपाल मंदिर, हरे कृष्ण ग्राम, ता. तासगाव, जि. सांगली. दूरध्वनी : (०२३४६) २५५५१५ /२५५७६६, ९३७११६३९५५
- **बीड** : श्री श्री राधा गोविंदजी मंदिर, सावतामाळी चौक - ४३११२२. दूरध्वनी : (०२४४२) २३१७९९, २३३०५४, ९३२५१६४७१३
- **नागपूर** : श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, भारतवाडा रोड, गुलमोहर नगर जवळ, रामानुज नगर, कलामन,नागपूर-८; दूरध्वनी : (०७१२)६९९४७३०, ९३७०१५६३८
- **निगडी**: 'श्री गोविंद धाम', आकुर्डी रेल्वे स्थानकानजीक, सर्वे नं.१८९/३ बी, सेक्टर २९ प्राधिकरण, रावेत, ता. हवेली, जि. पुणे. दर गुरुवारी सायं. ६ वा. दूरध्वनी : (०२०) ६५३०१८३६
- **पंढरपूर** : श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिर, हरे कृष्ण धाम, चंद्रभागा नदीच्या पूर्व तीरावर; जिल्हा सोलापूर, ४१३ ३०४. दूरध्वनी : (०२१८६) २६७२४२, २६७२६६, ९४२३३३५९९१
- **पुणे** : श्री श्री राधा कुंजबिहारी मंदिर, ४ तारापूर रोड, कँप, पुणे ४११ ००१ दूरध्वनी: (०२०)४१०३३२२२, ४१०३३२२३
- **मुंबई** : हरे कृष्ण धाम, जुहू ४०० ०४९, दूरध्वनी: (०२२) २६२० ६८६०.
- **मुंबई** : श्री श्री राधा गोपीनाथ मंदिर, के.एम. मुन्शी मार्ग, चौपाटी, मुबई ४०० ००७ , दूरध्वनी: (०२२) २३६६ ५५००, २३६९ ७२२८
- **मीरा रोड** : श्री श्री राधा गिरीधारी मंदिर, हरे कृष्ण धाम, मीरा रोड (पूर्व) जिल्हा ठाणे, दूरध्वनी: (०२२) २८१९०२९१

*महाराष्ट्रातील इतर साप्ताहिक सत्संग कार्यक्रम

- **अलिबाग** : हरे कृष्ण नामहट केंद्रे, श्री श्री विठ्ठलरुक्मिणी मंदिर, (संत गोरा कुं भार) रामनाथ, अलिबाग.दूरध्वनी :(०२१४१)२२०००५, ९४२३०९१०८१
- **अहमदनगर** :- 'वृंदावन'अहिल्या नगरी, पाईप लाईन रोड नगर, दर शनिवारी, सायं.७.०० वा. दूरध्वनी : (०२४१) २४२७७८५
- **औरंगाबाद** :-१९,राधा मोहन कॉलनी,खोकडपुरा. मोबाईल : ९३२६२००९१४. दर सोमवारी आणि मंगळवारी, सायं. ७ वा. दूरध्वनी: (०२४०)५६१९६५३.
- **कोल्हापूर** : हरे कृष्ण केंद्र, हरी ॐ नगर, शालिनी स्टुडीओ समोर, रंकाळा. दर रविवारी सायं. ४ ते ७ दूरध्वनी: (०२३१) २६९१७६१, २६९०५८६
- **कोरेगाव** : हेम चेंबर्स, झांजुर्णे ट्रान्सपोर्ट समोर, मेन रोड. दर गुरुवारी सायं. ६.३० वा. दूरध्वनी: (०२१६३) २२१०६४, ९८९०३२३२०१, २२०५४१
- **चाकण** :-जुने विष्णू मंदिर, मेन रोड, दर गुरुवारी सायंकाळी ७ ते ९ दूरध्वनी : (०२१३५) २५६१०४
- **चामोर्शी** : श्री श्री राधा-श्यामसुंदर मंदिर, ७८, कृष्णनगर, चामोर्शी, जि. गडचिरोली - २६४४०३. दुरध्वनी : ९४२३४२२९१४
- **तासगाव** : विठ्ठल मंदिर, महाकाली मंदिराजवळ, कवठे महानकाल (दर बुधवारी सायं. ६.३० वा.) दुरध्वनी : (०२३४१)२२२१२३.
- **दापोली** : राधा-कृष्ण मंदिरासमोर. दर शनिवारी सायं. ६ वा. दूरध्वनी: (०२३५८) २८२१४९ - (श्री. विश्वास फाटक.)
- **नासिक** : जनरल वैद्य नगर, वृंदावन कॉलनी, पूर्णिमा बस स्टॉपच्या पाठीमागे, द्वारका, नासिक - ४२२०११. दूरध्वनी - (०२५३) ६४५०००५, ९८५००७१२२७
- **नांदेड** : भूरेवाड बिल्डिंग, वरचा मजला, इतवारा मारुती चौकाजवळ, दर रविवारी सायं. ४ ते ७ वा. दूरध्वनी : (०२४६२) २५०४१०, ९३२५४४४७२३
- **जुन्नर** : श्री श्री राधाब्रजबिहारी मंदिर, मु. पो. खानगाव, जि. पुणे दूरध्वनी : (०२१३२) २८०४४१/ २८०४४२.
- **परभणी** : श्री. ए. जी. लोखंडे, शिवराम नगर, दर गुरुवारी सायं. ७ ते ९ वा. भ्रमणध्वनी : ९८२३२०२३९२.
- **पालघर** : श्री श्री गौर-निताई आश्रम, आर्यन् हायस्कूल जवळ, मिडलक्लास सोसायटी, जि. ठाणे. दर शनिवारी सायं. ६ ते ९. दूरध्वनी(०२५२५)२५११९०.
- **मिरज** : गर्डर विठ्ठल मंदिर, शिवाजी चौक, मंगळवार पेठ (दर शनिवार : संध्या. ६.३० वा.), दूरध्वनी : (०२३३) २२२६२५५/९८२२५२३८२६, दर सोमवारी ७ ते ९ पर्यंत.
- **सावंतवाडी** : नारायण मंदिर, मोती तलावाजवळ, दर शनिवारी सायं. ६ वा. दूरध्वनी: (०२३६३) २७३५०७, ९२४२१७६५८७.
- **सातारा** : शिवम् हॉल, कोटेश्वर मंदिराच्या पाठीमागे, शुक्रवार पेठ, सातारा. दुरध्वनी : ९७६३४९१४७१(०२१६२)२३७४१८(दर शनिवारी संध्या. ६.०० वा.)
- **सांगली** : मुरलीधर मंदिर, मारुती चौक, शिवाजी पुतळ्याजवळ, सांगली. (दर रविवारी सायं. ६.३० वा.) दूरध्वनी : (०२३३)२३२६४५४
- **सोलापूर** : हरे कृष्ण सत्संग भवन, सी-२६/७३, कारनिक नगर पाठीमागे, दूरध्वनी:९३७११७८३९३. दर रविवारी सायं. ६. वा. *(देहुगाव, लोणावळा येथील कार्यक्रमाच्या माहितीसाठी इस्कॉन-निगडी केंद्राशी संपर्क करा.)*
- **गोवा**: श्री सदन बिल्डींग, आय. डी. हॉस्पिटल जवळ, फोंडा तिस्क, फोंडा, गोवा. दूरध्वनी : (०८३२) २३१३१०५ ०९८५००९००३८/९४२२४५३९४२, दर रविवारी दुपारी १२.३० ते ३
- **बेळगाव** : श्री श्री राधा गोकुलानंद मंदिर, शुक्रवार पेठ, टिळकवाडी, कर्नाटक - ५९०००६. दूरध्वनी : (०८३१) २४३६२६७, २४००१०८.
- **रत्नागिरी** :जी. जी. पी. एस्. शाळेचा बेसमेंट हॉल, सिव्हिल हॉस्पिटलजवळ, दूरध्वनी :९४२२३८२६१२, दर रविवारी सायं ६.३० ते ८.३०

वृंदावनातील प्रेमधन आहे. माझ्या मनात या हरिनामाविषयी आसक्ती निर्माण का होत नाही? दिवस-रात्र माझे अंत:करण भौतिकवादाच्या विषामुळे जळत आहे आणि त्यासाठी मी कोणताच उपाय करीत नाही आहे?''

श्रील नरोत्तमदास ठाकूरांच्या या शब्दांतून आपण श्रीकृष्णनामात रूची नसल्याबद्दल खंत व्यक्त करण्यास शिकले पाहिजे. हरिनाम कानावर पडल्यावर आपल्या अंगावर रोमांच उभे राहत नसतील, तर आपले अंत:करण पाषाणाप्रमाणे कठोर असल्याचे जाणावे. नरोत्तम ठाकूरांनुसार भौतिकवादाच्या विषामुळेच आपणास हरिनामामध्ये रूची निर्माण होत नाही. या विषाचा परिणाम दूर करण्यासाठी सतत हरिनाम घेण्याशिवाय दुसरा कोणताच उपाय नाही. हरिनामाचा जप करण्यासाठी आपण गंभीर असू तर भगवंत आपल्या हृदयात हरिनामाप्रती श्रद्धा जागृत करतील आणि सतत घेतलेल्या हरिनामुळे नक्कीच आपण या सर्वश्रेष्ठ वरदानाची मधुरता चाखू शकू.

(मोहिनीराधा देवी दासी या कोलंबिया विद्यापिठातून इंग्रजी भाषेत पदवीधर आहेत. त्या प. पू. गोपाळकृष्ण गोस्वामींच्या शिष्या असून त्या आपल्या पतींसमवेत हरे कृष्ण लँड, जुहू येथील इस्कॉन मंदिरात राहतात.)

पैसे की भक्ती - श्रेष्ठ काय?

काही अंकांमागे आपण भगवान शिवांच्या गौरवाविषयी चर्चा केली होती. भगवान शिव अत्यंत भोळे, निष्पाप असल्याने ते 'भोलेनाथ' आणि लगेच संतुष्ट होत असल्याने 'अशुतोष' या नावांनी प्रसिद्ध आहेत. ते भौतिक जगाची आधिष्ठाती देवता, दुर्गादेवीचे पती असल्याने सर्वजण त्यांच्याकडे भौतिक समृद्धीचे वरदान प्राप्त करण्यासाठी येतात.

हे पाहून महाराज परीक्षितांनी शुकदेव गोस्वामींना एक महत्त्वपूर्ण प्रश्न विचारला – ''भगवान शिव हे वृक्षाखाली अथवा हिमालयाच्या पर्वतशिखरांवर निवास करतात. ते स्वत:साठी साधे घर देखील बांधत नाहीत. असे असताना त्यांचे भक्त मात्र अत्यंत ऐश्वर्यशाली जीवन जगतात. याउलट, भगवान श्रीकृष्ण अथवा श्रीविष्णू अत्यंत वैभवशाली जीवन जगतात; परंतु त्यांचे भक्त मात्र अत्यंत हालाखीत दिवस काढत असतात? हे असे का?

श्रील शुकदेव गोस्वामींनी परीक्षितांच्या या बुद्धिमान प्रश्नाची स्तुती केल्यानंतर ते सांगू लागले की, हे भौतिक जग त्रिगुणांनी बनलेले आहे. भगवान शिव या त्रिगुणांवर नियंत्रण करणाऱ्या दुर्गादेवीचे पती असल्याने त्यांना भौतिक प्रकृतीचे स्वामी मानले जाते. बद्ध जीवात्म्यांच्या हितासाठी ते या त्रिगुणांच्या संपर्कात असले तरी या गुणांद्वारे ते कधीच प्रभावित होत नाहीत. थोडक्यात सांगायचे तर, बद्ध जीवात्मे त्रिगुणांद्वारे प्रभावित होतात; परंतु, भगवान शिव भौतिक प्रकृतीचे स्वामी असल्याने त्यांच्यावर या त्रिगुणांचा कोणताच प्रभाव पडत नाही.

हे भौतिक जग त्रिगुणांपासून निर्माण झाले असल्याने या जगातील सर्व विविधता देखील त्रिगुणांमुळेच निर्माण झालेली आहे. आधुनिक विज्ञानाच्या आधारे आज लोकांनी अनेक यांत्रिक उपकरणे, सुखसुविधा निर्माण केल्या आहेत; परंतु, हे सर्व त्रिगुणांच्या आपापसातील क्रियांचाच परिणाम आहे. भगवान शिवांच्या भक्तांकडे भौतिक सुखसुविधा प्रदान करणाऱ्या वस्तू असल्या तरी हे जाणले पाहिजे की, त्या सर्व त्रिगुणांचीच निर्मिती आहे. भौतिक आनंद किंवा ऐश्वर्य म्हणजे इंद्रियतृप्ती करणे – विशेषत:, जननेंद्रिय, जिह्वा आणि मन यांची. यामुळे या भौतिक जगात एखाद्या व्यक्तीकडे यथेच्छ संभोगसुख घेण्याची आणि स्वादिष्ट अन्नपदार्थ खाण्याची सोय असेल तर त्याला ऐश्वर्यशाली समजले जाते.

अशा प्रकारे भगवान शिवांच्या भक्तांकडील ऐश्वर्य म्हणजे भौतिक प्रकृतीच्या त्रिगुणांद्वारे निर्मित वस्तूंचा संग्रह असतो. परंतु, अशा भौतिक वस्तूंच्या संग्रहामुळे जीवात्मा या भौतिक जगात आणखीच बद्ध होतो. त्यामुळे असे ऐश्वर्य हे प्रगतीचे लक्षण नसून अधोगतीचे लक्षण आहे.

सारांश, भगवान शिव हे त्रिगुणांचे स्वामी असल्याने त्यांच्या भक्तांना त्रिगुणांपासून बनविलेल्या वस्तू प्रदान केल्या जातात, ज्याद्वारे ते इंद्रियतृप्ती करू शकतील. मात्र, भगवद्गीतेत श्रीकृष्ण या त्रिगुणांच्या पलीकडे जाण्यास सांगतात – *निस्त्रैगुण्य भवार्जुना.* मनुष्य जीवनात आपण त्रिगुणांच्या पलीकडे जाऊन दिव्यस्तरावर स्थित होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण *निस्त्रैगुण्य* झाल्याविना या भौतिक जगाच्या कचाट्यातून मुक्त होऊ शकत नाही.

दुसऱ्या शब्दांत, शिवांकडून प्राप्त झालेले भौतिक ऐश्वर्यांचे वरदान हे जीवात्म्याच्या शाश्वत अस्तित्वासाठी हितकारक नाहीत. स्वत: भगवान शिव अशा ऐश्वर्यांपासून पूर्णपणे मुक्त आहेत.

पुराणांमध्ये एके ठिकाणी शिवांच्या पार्वतीबरोबरील विवाहाचे वर्णन येते. विवाहावेळी अतिथींनी दांपत्याला भेट देण्याची आणि दांपत्याने देखील पाहुण्यांचा भेट देण्याची प्रथा आहे. विवाहाप्रसंगी शिवांना एक भव्य राजमहाल भेट म्हणून देण्यात आला. विवाहसोहळा संपेपर्यंत शिवांनी त्यांना भेटीदाखल प्राप्त झालेल्या सर्व वस्तू पुन्हा पाहुण्यांमध्ये वाटून दिल्या. आता त्यांच्याकडे केवळ तो राजमहालच बाकी उरला होता. सगळे पाहुणे निघून गेल्यावर तेथे एक ब्राह्मण आला असता भगवान शिवांनी तो राजमहाल ब्राह्मणाला भेट म्हणून दिला आणि स्वत: एका वृक्षाखाली राहू लागले. तर असे आहे, भौतिक भोगविलासाप्रती भगवान शिवांचे वैराग्य. ते भगवान श्रीहरींच्या सुंदर रूपावर ध्यान करण्यातच आपला आनंद मानतात.

– श्यामानंद दास